रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ३२६
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ रविवार, १४ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

हिंदुत्व राष्ट्रीय एकात्मतेचा पाया -सुनील देवधर/२
सौरऊर्जेच्या वापरात नवी मुंबई अव्वल/६
महिला वर्ल्डकपमध्ये आज भारत-पाकिस्तान लढत/८

## लेफ्टनंट जनरल धीरज सेठ भारताचे नवे लष्करप्रमुख



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांची भारताचे पुढील लष्करप्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. ३० जूनपासून ते पदाची धुरा सांभाळतील. लेफ्टनंट जनरल धीरज सेठ हे भारतीय लष्करामधील अनुभवी अधिकाऱ्यांपैकी एक आहेत. डिसेंबर १९८६ रोजी आर्मर्ड कोअरमध्ये दाखल झालेल्या धीरज सेठ यांनी लष्करामध्ये सुमारे चार दशके सेवा दिली आहे. त्यांनी अनेक महत्त्वाच्या स्टाफ आणि धोरणात्मक पदांवर काम केले आहे. आपल्या दीर्घ कारकिर्दीदरम्यान त्यांनी वाळवंटी प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि पश्चिम सीमेवर विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. लष्कराच्या आधुनिकीकरणातही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. ते जनरल उपेंद्र द्विवेदी यांची जागा घेणार असून त्यांचा कार्यकाळ ३१ ऑगस्ट २०२८पर्यंत असेल.

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



# लोकनेते रामशेठ ठाकूर समाजासाठी आदर्श

## रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांचे गौरवोद्गार

### सातारा येथे भव्य सत्कार

**सातारा : हरेश साठे**

कृती आणि उक्तीतून आदर्श घडविणारी व्यक्तिमत्त्वे समाजासाठी मार्गदर्शक ठरतात. रयत शिक्षण संस्थेचा विद्यार्थी म्हणून तिचे ऋण फेडणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे दातृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व हे लोकाभिमुख असून समाजासाठी आदर्शवत आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि जनकल्याणकारी कार्यात त्यांनी स्वतःला पूर्णपणे झोकून दिले असून रयतेसाठी आपले सर्वस्व अर्पण केले आहे, असे गौरवोद्गार संस्थेचे अध्यक्ष, माजी केंद्रीय मंत्री खासदार शरद पवार यांनी शनिवारी (दि.१३) येथे काढले.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, थोर दानशूर व्यक्तिमत्त्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सवी भव्य सत्कार सोहळा आशिया खंडातील सर्वांत मोठी शिक्षण संस्था असलेल्या 'रयत'च्या वतीने सातारा येथील जिल्हा सहकारी बँकेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार बोलत होते.

या सोहळ्यात खासदार शरद पवार यांच्या हस्ते लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांचा मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, जनरल बॉडी सदस्य, विविध शाखांचे प्रतिनिधी, प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षणप्रेमी, हितचिंतक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्याला प्रमुख मान्यवर म्हणून रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सिक्कीम राज्याचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील, खासदार नितीन पाटील, प्रमुख वक्ते ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, आमदार विश्वजित कदम, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे पुत्र आमदार प्रशांत ठाकूर आणि नगरसेवक परेश ठाकूर, आमदार सर्वश्री बाळासाहेब पाटील, शशिकांत शिंदे, प्रभाकर देशमुख, कर्मवीर विद्यापीठाचे कुलगुरू ज्ञानदेव म्हस्के, सहसचिव शिवलिंग मेनकुदळे, उपाध्यक्ष अरुण कडू पाटील, लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, जनरल बॉडी सदस्य जे.एम. म्हात्रे, महेंद्र घरत, वाय.टी. देशमुख आणि ठाकूर कुटुंबीयांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. (पान २ वर..)

### 'रयत'नेच व्यक्तिमत्त्वाला आकार दिला -लोकनेते रामशेठ ठाकूर



सत्काराला उत्तर देताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित मान्यवर, पदाधिकारी, शिक्षक आणि हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार मानले. गेल्या ५२ वर्षांपासून आपण रयत शिक्षण संस्थेमध्ये घडत आलो असून या संस्थेनेच आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला, असे भावनिक उद्गार त्यांनी काढले. मिळालेल्या प्रेमाने आणि सन्मानाने आपण भारावून गेलो असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. रयत शिक्षण संस्थेशिवाय आपला एकही दिवस जात नाही, असे सांगताना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांची आणि शिकवणुकीची प्रेरणा आयुष्यभर मार्गदर्शक ठरल्याचे त्यांनी नमूद केले तसेच संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून ते कायम पाठीशी उभे राहिल्याचे सांगितले.

विश्वास आणि जनकल्याणाच्या प्रवासाची तपपूर्ती!

# विकसित भारताच्या दिशेने वाटचाल -मंत्री आशिष शेलार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारची गेल्या १२ वर्षांची कारकीर्द ही केवळ योजनांची किंवा आकडेवारीची गोष्ट नसून विकसित, आत्मनिर्भर, सुरक्षित आणि समृद्ध भारत घडविण्याचा एक ऐतिहासिक प्रवास आहे. गरीब, शेतकरी, महिला, युवक आणि समाजातील प्रत्येक घटकाच्या सक्षमीकरणाद्वारे "विकसित भारत २०४७"चे स्वप्न साकार करण्यासाठी सरकार कटिबद्ध असून आगामी काळातही विकासाचा हा प्रवास अधिक वेगाने सुरू राहील, असा विश्वास राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री तथा भाजपचे रायगड जिल्हा संपर्कमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी शनिवारी (दि.१३) येथे पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

देशाच्या विकासाला नवी दिशा देत सर्वसमावेशक प्रगती, आत्मनिर्भर भारत, पायाभूत सुविधांचा विकास, डिजिटल क्रांती, सामाजिक कल्याण, जागतिक स्तरावर भारताची वाढती प्रतिष्ठा अशा विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीची माहिती देण्यासाठी पनवेल येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृहात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मंत्री ॲड. शेलार बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत देशात झालेल्या ऐतिहासिक विकासकामांचा व विविध जनकल्याणकारी योजनांचा आढावा त्यांनी सादर केला.

पत्रकार परिषदेला आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सभापती वैकुंठ पाटील, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, पनवेल महापालिकेचे स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, उरण नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष रवी भोईर, खोपोली नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, राजेश भगत, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, माथेरान नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष संतोष शेलार, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह इतर प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून गेल्या १२ वर्षांमध्ये देशाने घेतलेली गरुडझेप आणि तळागाळातील लोकांपर्यंत पोहचलेल्या शासकीय योजनांचा लेखाजोखा मंत्री ॲड. शेलार यांनी मांडला. २०१४मध्ये देशाने नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. २०१९मध्ये अधिक मोठ्या बहुमताने पाठिंबा दिला आणि २०२४मध्ये सलग तिसऱ्यांदा सत्तेची संधी देत जनतेने विकासाच्या राजकारणावर शिक्कामोर्तब केले. आज राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) देशातील २२ राज्यांमध्ये जनसेवा करत असून जनतेचा विश्वास हीच मोदी सरकारच्या यशाची सर्वांत मोठी ताकद असल्याचे ते म्हणाले.

मंत्री शेलार यांनी पुढे म्हटले की, सलग तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर पंतप्रधानांनी सर्वप्रथम प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या फाईलवर स्वाक्षरी केली. यावरून गरीब, शेतकरी, महिला आणि युवक हे सरकारच्या धोरणांच्या केंद्रस्थानी असल्याचे स्पष्ट होते. (पान २ वर..)

## हृदयद्रावक! माणगावमध्ये महिलेने स्वतः विष पिऊन मुलांनाही दिले

### आईसह दोन मुलींचा अंत; अन्य दोघांची प्रकृती गंभीर

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव तालुक्यातील खरवली आदिवासीवाडीमध्ये एका विवाहित महिलेने स्वतः विष प्राशन करून आपल्या मुला-मुलींनादेखील ते पाजून संपविण्याचा प्रयत्न केला. या घटनेत आई आणि दोन मुलींचा मृत्यू झाला असून अन्य दोघांची प्रकृती गंभीर आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार खरवली आदिवासीवाडीत राहणारे धर्मा जाधव यांची पत्नी आशा जाधव हिने शनिवारी (दि.१३) सकाळी कोल्ड्रिंक्समध्ये विष मिसळून ते स्वतः प्यायले. त्याचप्रमाणे आपल्या चार मुलांनाही ते पाजले. यामध्ये महिलेसह मुलगी दुर्वा जाधव (७), नंदिनी जाधव (४) यांचा मृत्यू झाला, तर मुलगा रवी जाधव (८) आणि मुलगी राजश्री जाधव (४) यांची स्थिती गंभीर आहे.

आशा जाधवने विष आणि मासे मारण्याची गोळी कोल्ड्रिंक्समध्ये टाकून ते स्वतः व मुलांना दिल्याचा प्राथमिक अंदाज आहे तसेच ही घटना कौटुंबिक वादामुळे आलेल्या नैराश्यातून घडली असल्याचेही समजत आहे. दरम्यान, याबाबतची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

## नदीपात्रात बुडून चार जणांचा मृत्यू

**पणजी : वृत्तसंस्था**

गोव्याच्या कुळे येथील मेटावाडा भागात पुलाजवळील दूधसागर नदीपात्रात पोहण्यासाठी उतरलेल्या वास्को परिसरातील चार तरुणांचा शनिवारी (दि.१३) पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. मृतांमध्ये चिखली-मुरगाव येथील तीन सख्ख्या भावांचा समावेश आहे.

मृत सर्वच जण १९ ते २५ वयोगटातील होते. या घटनेने परिसरावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# आसाममध्ये हवाई दलाचे विमान कोसळले

### पायलटसह पाच जवान शहीद, सहवैमानिक जखमी

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**



आसाममधील जोरहाट येथील भारतीय हवाई दलाच्या एअरफोर्स स्टेशनवर शनिवारी (दि.१३) सकाळी झालेल्या एएन-३२ मालवाहू विमानाच्या भीषण अपघातात पायलटसह पाच जवान शहीद झाले आहेत. या दुर्घटनेत विमानाचा सहवैमानिक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर लष्करी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अरुणाचल प्रदेशातील नियोजित मोहीम पूर्ण करून हे विमान नियमित उड्डाणानंतर जोरहाट एअर बेसवर परतत होते, मात्र लँडिंगदरम्यान विमानाला अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार विमान धावपट्टीवर उतरण्याच्या तयारीत असताना तांत्रिक अडचण निर्माण झाली. त्यामुळे विमान मुख्य रनवेवर उतरू शकले नाही आणि एअर बेसमधील गवताळ भागात कोसळले. जोरदार धडकेनंतर विमानाचा स्फोट झाला आणि त्याला भीषण आग लागली. अपघाताची तीव्रता इतकी होती की विमानाचे अनेक तुकडे झाले.

या घटनेची माहिती मिळताच एअरफोर्सचे आपत्कालीन पथक, अग्निशमन दल आणि बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली, मात्र आगीच्या विळख्यात अडकलेल्या पाच जवानांना वाचवण्यात यश आले नाही. या भीषण दुर्घटनेतून सहवैमानिकाला गंभीर अवस्थेत बाहेर काढण्यात आले. त्याला तातडीने लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. तांत्रिक बिघाड, हवामानातील बदल किंवा इतर कोणते कारण यामागे आहे याचा शोध घेण्यासाठी भारतीय हवाई दलाने उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

# कोकणात पर्यटन विकासाला गती

### योजनांना लाभार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



कोकण किनारपट्टीवरील जिल्ह्यांमध्ये पर्यटन संचालनालयाच्या कोकण भवन (नवी मुंबई) येथील विभागीय कार्यालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध महत्त्वाकांक्षी पर्यटन योजनांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. शासनाच्या कृषी पर्यटन, होम स्टे (निवास न्याहारी), टूरिस्ट व्हिला, टूरिस्ट अपार्टमेंट आणि व्हेकेशन होम (पर्यटन निवास) यांसारख्या विविध कल्याणकारी व रोजगाराभिमुख योजनांतर्गत लाभार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर अर्ज सादर करून लाभ घेतला आहे.

संपूर्ण कोकण विभागातून विविध पर्यटन उपक्रमांसाठी एकूण ४७६ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी कागदपत्रांची पडताळणी आणि स्थळ पाहणी पूर्ण करून ३७९ यशस्वी लाभार्थ्यांना अंतिम प्रमाणपत्रे जारी करण्यात आली आहेत. यात सर्वाधिक वाटा कृषी पर्यटन क्षेत्राचा असून या माध्यमातून कोकणच्या ग्रामीण भागात पर्यटनाचे एक नवे पर्व सुरू झाले आहे.

कृषी पर्यटन योजनेला सर्वाधिक पसंती मिळाली आहे. या अंतर्गत आतापर्यंत एकूण ४३३ अर्ज प्राप्त झाले होते, ज्यापैकी ४३० स्थळांची प्रत्यक्ष पाहणी पूर्ण झाली असून ३३६ लाभार्थ्यांना यशस्वीरित्या प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. यामध्ये रायगड जिल्ह्याने आघाडी घेतली असून रायगडमधून सर्वाधिक १४९ अर्ज आले होते, ज्यापैकी ११३ कृषी पर्यटन केंद्रांना प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.

कृषी पर्यटनासोबतच पर्यटकांना स्थानिक आदरातिथ्याचा अनुभव देणाऱ्या होम स्टे आणि व्हेकेशन होम म्हणजेच सुट्टीतील निवास व्यवस्था योजनांनाही चांगला प्रतिसाद लाभत आहे. होम स्टे योजनेंतर्गत कोकण विभागातून एकूण चार अर्ज प्राप्त झाले होते आणि या सर्व चार अर्जांची स्थळ पाहणी पूर्ण करून त्यांना प्रमाणपत्रे जारी करण्यात आली. टूरिस्ट व्हिला योजनेसाठी एकूण १० अर्ज प्राप्त झाले होते. या सर्व १० अर्जदारांची जागेवर पाहणी करून त्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.



# आपत्कालीन परिस्थितीसाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करा -मंत्री आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळ्यात संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचे नियोजन करताना रेल्वे, महापालिका, बेस्ट, जिल्हाधिकारी कार्यालये, मेट्रो आणि अन्य प्राधिकरणांनी सर्वसमावेशक आराखडा तयार करून समन्वयाने काम करण्याच्या सूचना मुंबई उपनगर पालकमंत्री आशिष शेलार यांनी दिल्या. मुंबईतील रेल्वेच्या हद्दीत येणाऱ्या नालेसफाईच्या कामाचा व मान्सूनपूर्व कामाचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री शेलार यांनी पश्चिम रेल्वेच्या मुख्यालयात समन्वय बैठक घेतली.



या बैठकीला मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे, मध्य रेल्वेचे विभागीय महाव्यवस्थापक हिरेश मीणा, पश्चिम रेल्वेचे विभागीय महाव्यवस्थापक पंकज सिंग यांच्यासह मुंबई शहर आणि उपनगराचे जिल्हाधिकारी, महापालिका, रेल्वे, फायर ब्रिगेडचे अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री शेलार यांनी सांगितले की, दुर्दैवाने पूर परिस्थिती निर्माण झाली तर ज्या रेल्वे स्टेशनवर गर्दी होईल अशा रेल्वे स्टेशनमधून गर्दी बाहेर काढणे, बाहेरच्या रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करणे, प्रवाशांना पाणी, अन्नपदार्थ देणे या एकूण परिस्थितीचा सर्वसमावेशक आराखडा तयार करा. तसेच दोन्ही प्राधिकरणाच्या सीसीटीव्ही आणि सूचना देणारी यंत्रणा, आपत्कालीन कक्ष यामध्ये समन्वय ठेवा.

रेल्वे स्टेशनमधील आणि बाहेरील पादचारी पूल, वाहतुकीचे पूल, रेल्वे स्टेशन परिसरातील होर्डिंग या सगळ्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करा. रेल्वे आणि महापालिका यांचे पंप यांचाही सर्वसमावेशक आराखड्यात सुव्यवस्थित समावेश करण्याच्या सूचना मंत्री शेलार यांनी केल्या. तसेच मस्जिद बंदर आणि परिसरातील रेल्वे हद्दीत येणाऱ्या व धोकादायक ठरलेल्या २४ इमारती आणि काही झोपड्या यांचे पुनर्वसन व तेथील रहिवासी याबाबत सविस्तर अहवाल तयार करून शासनाकडे पाठविण्याच्या सूचनाही मंत्री शेलार यांनी केल्या. पश्चिम रेल्वेने सांगितले की, पाण्याचा निचरा करण्यासाठी चर्चगेट ते विरारदरम्यान एकूण १५ मायक्रो टनेल रेल्वे ट्रॅकखालून करण्यात आले असून या वर्षात ४ मायक्रो टनेल पूर्ण करण्यात आले आहेत. तर पाणी उपसण्यासाठी पंपांची संख्या वाढवून यावेळी १२६ पंप बसवण्यात आले आहेत. २४०० वॅगन गाळ काढण्यात आला आहे. मध्य रेल्वे मार्गावरही पंपांची संख्या वाढवण्यात आली असून २२० पंप बसवण्यात आले आहेत. ३५० किलोमीटर लांबीच्या मार्गावरील १६० नाले व गटारांची सफाई करण्यात आली आहे.

दोन्ही मार्गांवर सीसीटीव्ही कॅमेरे आणि पर्जन्यमापक बसवण्यात आले आहेत. यावेळी कांजूरमार्ग येथील उषानगर नाला आणि कुर्ला येथील ब्राह्मणवाडी नाल्याच्या खोलीकरण व रुंदीकरणाची कामे करण्यात आल्याने पाण्याचा निचरा वेगाने होईल. दोन्ही रेल्वेचे सादरीकरण झाल्यानंतर मुंबई महापालिका व फायर ब्रिगेडने काही सूचना केल्या. रेल्वे व महापालिकेत पूर्वीपेक्षा आता अधिक चांगला समन्वय होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# हिंदुत्व राष्ट्रीय एकात्मतेचा पाया

## भाजप नेते सुनील देवधर यांचे प्रतिपादन

**मुरूड : प्रतिनिधी**

भारताची ओळख हिंदू संस्कृती, इतिहास आणि परंपरांशी निगडित असून हिंदुत्व ही केवळ धार्मिक संकल्पना नसून भारतीय जीवनमूल्ये, परंपरा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा पाया आहे, असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन भाजप नेते सुनील देवधर यांनी केले. मुरुड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृहात आयोजित सकल हिंदू संमेलनात प्रमुख वक्ते म्हणून सुनील देवधर बोलत होते.



आपल्या मार्गदर्शनात त्यांनी हिंदुत्व हे कोणत्याही एका पंथापुरते मर्यादित नसून भारतीय जीवनशैलीचे व्यापक दर्शन असल्याचे सांगितले. नारी शक्तीचा गौरव वाढविणाऱ्या राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर, राणी चन्नम्मा, सावित्रीबाई फुले आदी रणरागिणींच्या कर्तृत्वाची उदाहरणे देत स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या द्रष्टेपणामुळे सामाजिक समरसता राखता आली, असे सांगून श्रीराम मंदिरासह सांस्कृतिक प्रतीकांचा सन्मान प्रत्येक हिंदूने जोपासण्याचे आवाहन केले.सक्तीच्या धर्मांतराला निक्षून विरोध केला पाहिजे. तसेच सर्वांसाठी न्याय, कोणाचेही तुष्टीकरण नाही – शासनाने सर्व नागरिकांना समान न्याय द्यावा, मात्र मतांच्या राजकारणासाठी कोणत्याही समाजघटकाचे तुष्टीकरण करू नये, असा सल्ला त्यांनी दिला.

यावेळी व्यासपीठावर सुनील देवधर, रायगड विभाग सेवा प्रमुख रविकिरण काळे, मुरूड कराडी समाज अध्यक्ष नरेश दोडकुलकर, संजय ठाकूर, समीर उपाध्ये, अंकित सिंह, अंकेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी रविकिरण काळे यांनी संघ शताब्दी वर्षानिमित्त पर्यावरण, स्वबोध, नागरिक कर्तव्य, सामाजिक समरसता व कुटुंब प्रबोधन या पंचसूत्रीवर विचार व्यक्त करून सर्व समाज बांधवांनी या उपक्रमात सहभागी होऊन जनजागृतीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात मुरूड मंडळातील सर्व ज्ञाती समाज अध्यक्षांचा तसेच पाखाडी अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. या सकल हिंदू संमेलनात मुरूडसह तेलवडे, एकदरा, विहूर येथील युवक, महिला वर्ग, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर उपाध्ये, तर आभार प्रदर्शन अंकित सिंह यांनी केले. सांघिक गीत कुमार आरकशी यांनी गायले. अक्षय भाटकर यांनी संपूर्ण वंदे मातरम् सादर करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर समाजासाठी आदर्श

खासदार शरद पवार यांनी पुढे बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनप्रवासाचा आणि समाजासाठी केलेल्या कार्याचा विशेष उल्लेख केला. जीवनातील प्रत्येक टप्प्यावर त्यांनी उत्कृष्ट कार्य करून समाजात वेगळी ओळख निर्माण केली असल्याचे सांगत रामशेठ ठाकूर यांच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली. रायगड जिल्ह्याच्या विकासात तसेच रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीत रामशेठ ठाकूर यांचे योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. लोकांच्या समस्या समजून घेऊन त्यांची तत्परतेने सोडवणूक करण्यासाठी ते नेहमीच अग्रेसर राहिले आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

ज्ञानदानाची कवाडे सर्वसामान्यांसाठी खुली व्हावीत, शिक्षणाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचावा या ध्येयाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मोठे कार्य उभे केले आहे. रयत शिक्षण संस्थेत शिक्षण घेऊन त्यांनी आपल्या कर्तृत्व, परिश्रम आणि दूरदृष्टीच्या बळावर यश संपादन करत हजारो हातांना सन्मानाने रोजगार व आधार दिला असल्याचेही खासदार पवार यांनी सांगितले.

रयत शिक्षण संस्थेच्या विविध उपक्रमांमध्ये कोणतीही अपेक्षा न ठेवता लोकनेते रामशेठ ठाकूर सातत्याने योगदान देत असतात. समाजातील गरजू, विद्यार्थी, शैक्षणिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख असल्याचे प्रशंसोद्‌गार खासदार पवार यांनी काढले. रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा सन्मान करण्याची संधी मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना समाजासाठी त्यांचे योगदान प्रेरणादायी असून भावी पिढ्यांसाठी ते आदर्श असल्याचे ते आवर्जून म्हणाले.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ज्येष्ठ विचारवंत एन.डी. पाटील, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दि.बा. पाटील आणि कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते जनार्दन भगत यांच्या आठवणींना उजाळा दिला तसेच आपण रयत शिक्षण संस्था संचलित छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये 'कमवा व शिका' योजनेत शिक्षण घेतले असून या महाविद्यालयानेच आपल्या आयुष्याला नवी दिशा दिली. हेच महाविद्यालय आपल्या जीवनातील टर्निंग पॉईंट ठरल्याचे सांगितले.

आयुष्यात अनेक पुरस्कार मिळाले, मात्र रयत शिक्षण संस्थेकडून प्रदान करण्यात आलेला रयत माऊली पुरस्कार हा आपल्या आयुष्यातील सर्वात मोठा आणि सन्मानाचा पुरस्कार असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. आई-वडील आणि शिक्षकांचे संस्कार व मार्गदर्शन लाभल्यामुळेच स्वतःला सामाजिक कार्यासाठी वाहून घेता आले, असेही त्यांनी म्हटले.

"मी घडलो असलो तरी माझे घडणे अजून संपलेले नाही. रयतशिवाय राम घडला नसता," अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या तसेच रयत शिक्षण संस्थेच्या विकासासाठी आपण सदैव तत्पर राहू, अशी ग्वाही देत आपल्या भाषणाचा समारोप केला.

अध्यक्षीय भाषणात रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवन प्रवासाचा आणि अफाट कार्याचा आढावा मांडला. त्यांनी पुढे म्हटले की, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर विशेष प्रेम असून त्यांच्या समाजाभिमुख कार्यामुळेच रयत शिक्षण संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्याच्या सूचना पवारसाहेबांनी दिल्या होत्या. आजचा हा सोहळा म्हणजे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याप्रति व्यक्त करण्यात आलेला आदर आणि कृतज्ञतेचा भाव असल्याचे त्यांनी नमूद केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांची जडणघडण, त्यांचे सामाजिक कार्य आणि जनसेवा सर्वश्रुत असल्याचे सांगत दळवी म्हणाले की, आज सकाळी त्यांनी सहकुटुंब व शेकडो हितचिंतकांसह स्वतः शिक्षण घेतलेल्या महाविद्यालयाला आणि परिसराला भेट देऊन तेथील आठवणींना उजाळा दिला तसेच कर्मवीरांच्या समाधीस्थळाला अभिवादन केले. रयत शिक्षण संस्थेबद्दल त्यांच्या मनात असलेल्या प्रेमाची ही मोठी साक्ष असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या घरी दररोज शेकडो लोक मदतीच्या अपेक्षेने येतात आणि कोणीही रिकाम्या हाताने परत जात नाही, हीच त्यांच्या जीवनकार्याची खरी ओळख असल्याचे दळवी यांनी सांगितले. रयत शिक्षण संस्थेसाठी त्यांनी दिलेले योगदान अविस्मरणीय असून त्यांनी दिलेल्या शेकडो कोटी रुपयांच्या देणग्यांचा हिशेब ठेवणेही कठीण असल्याची प्रांजळ कबुली त्यांनी दिली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिक्षण, समाजकारण आणि लोकसेवा या क्षेत्रांत केलेले कार्य अफाट असून त्यातून त्यांनी मोठा नावलौकिक मिळविला आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांवर त्यांचा विश्वास असून त्या विचारांचा वारसा त्यांनी आपल्या कार्यातून जपला आहे, असे गौरवोद्‌गार दळवी यांनी यावेळी काढले.

आमदार विश्वजित कदम यांनी आपल्या मनोगतात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या दातृत्वपूर्ण कार्याचा गौरव करताना "दातृत्वाचे मोठे आणि पहिले नाव म्हणजे लोकनेते रामशेठ ठाकूर," असे गौरवोद्‌गार काढले. छत्रपती शिवाजी महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आदर्शांचा वारसा जपत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजकारण आणि शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजासाठी केलेले कार्य कोणत्याही शब्दांत मोजता येणार नाही. विशेष म्हणजे त्यांच्या दातृत्वाला आजही पूर्णविराम लागलेला नाही. गरजूंसाठी मदतीचा हात पुढे करण्याची त्यांची वृत्ती आणि मनाचा मोठेपणा हेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे वैशिष्ट्य असल्याचे कदम यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाने विमानतळाचे नामकरण व्हावे यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी घेतलेल्या पुढाकाराचाही विशेष उल्लेख केला तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांचे वडील पतंगराव कदम हे दोघेही रयत शिक्षण संस्था परिवारातील विद्यार्थी व पदाधिकारी असून त्यांच्यात जिव्हाळ्याचे मैत्रीपूर्ण संबंध होते, अशी आठवण त्यांनी सांगितली.

"मी जेव्हा रामशेठ ठाकूर यांच्या पाया पडतो, तेव्हा विधायक कार्य करण्याची नवी ऊर्जा मिळते. त्यामुळे हा केवळ त्यांचा अमृत महोत्सव नसून जनतेच्या प्रेमाचा आणि कृतज्ञतेचा लोकोत्सव आहे," अशा भावनिक शब्दांत आमदार विश्वजित कदम यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले थोर विचारवंत आणि ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जीवनप्रवास आपल्या मनोगतातून विस्तृतपणे मांडला. अनेक उदाहरणे आणि किस्से सांगत एकप्रकारे जीवनपट त्यांनी अधोरेखित केला. रामशेठ ठाकूर यांचा अभीष्टचिंतन सोहळा हा केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून रयत शिक्षण संस्था या मातृसंस्थेने आपल्या विद्यार्थ्याचा केलेला सन्मान आहे, तर 'रयत'च्या पाठीशी रामशेठ ठामपणे उभे राहणारे आहेत, असे त्यांनी म्हटले.

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी लिहिलेल्या 'रामशेठ नाबाद ७५' या ग्रंथाचे तसेच रयत शिक्षण संस्थेच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणाऱ्या 'अमृतपर्व' या स्मरणिकेचे प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते या सोहळ्यात झाले.

उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी प्रास्ताविक केले. ऑडिट विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना प्रदान करण्यात आलेल्या मानपत्राचे वाचन केले, तर माध्यमिक विभागाचे सहसचिव बी. एन. पवार यांनी सर्वांचे आभार मानले.

उपस्थित मान्यवरांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांचे योगदान भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. रयत शिक्षण संस्थेच्या इतिहासात हा सोहळा एक संस्मरणीय पर्व ठरले असून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे शिक्षण, समाजकारण आणि दानशूरतेतील कार्य पुढील अनेक वर्षे प्रेरणास्रोत राहील, अशी भावना या सोहळ्यातून अधोरेखित झाली.

## विकसित भारताच्या दिशेने वाटचाल -मंत्री आशिष शेलार

सार्वजनिक विश्वास आणि सुशासनाचा नवा अध्याय "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास" या मंत्राला मोदी सरकारने केवळ घोषणेत न ठेवता जनआंदोलनाचे स्वरूप दिले. प्रत्येक योजनेचा लाभ समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहचवण्यावर सरकारने भर दिला. तंत्रज्ञानाधारित प्रशासन, थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) आणि पारदर्शक यंत्रणांमुळे लाखो बनावट लाभार्थी हटवण्यात आले आणि सरकारी निधीची मोठ्या प्रमाणावर बचत करण्यात यश आले.

देशाच्या सीमा आणि अंतर्गत सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत सर्जिकल स्ट्राइक, एअर स्ट्राइक आणि दहशतवादाविरोधातील कठोर कारवायांमुळे भारताने जगासमोर आपली ठाम भूमिका स्पष्ट केली. नक्षलवादाविरोधातील प्रभावी मोहिमेमुळे अनेक भागांमध्ये शांतता आणि विकासाचा मार्ग मोकळा झाला असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सलग तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर पंतप्रधानांनी सर्वप्रथम प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या फाईलवर स्वाक्षरी केली. यावरून गरीब, शेतकरी, महिला आणि युवक हे सरकारच्या धोरणांच्या केंद्रस्थानी असल्याचे स्पष्ट होते. मोदी सरकारच्या काळात प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत ५८ कोटींहून अधिक बँक खाती उघडण्यात आली असून त्यापैकी ३२ कोटींहून अधिक खाती महिलांच्या नावावर आहेत.

कोविड-१९ महामारीच्या काळापासून ८१ कोटींहून अधिक नागरिकांना मोफत धान्य पुरविण्यात आले. आयुष्मान भारत योजनेंतर्गत ६० कोटींहून अधिक आरोग्य कार्ड वितरित करून गरीब कुटुंबांना मोफत उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेद्वारे ५८ कोटींहून अधिक नागरिकांना विमा संरक्षण मिळाले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत चार कोटींहून अधिक कुटुंबांना पक्की घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. उज्ज्वला योजनेद्वारे ११ कोटी महिलांना मोफत गॅस जोडणी देऊन धुरापासून मुक्त जीवन देण्यात आले. जलजीवन मिशनअंतर्गत १६ कोटींहून अधिक ग्रामीण कुटुंबांना नळाद्वारे स्वच्छ पिण्याचे पाणी मिळाले आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत १२ कोटींहून अधिक शौचालयांची उभारणी करून देशात स्वच्छतेची क्रांती घडवून आणण्यात आली.

पीएम स्वनिधी योजनेंतर्गत ७४ लाखांहून अधिक पथविक्रेत्यांना सुलभ कर्ज उपलब्ध झाले आहे. मुद्रा योजनेद्वारे ५७ कोटींहून अधिक तारणमुक्त कर्जांचे वितरण करण्यात आले आहे. प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेमुळे ३० लाखांहून अधिक पारंपरिक कारागीर आणि हस्तकला व्यवसायिकांना थेट लाभ मिळाला आहे. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी १५ हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून धरती आबा ग्राम उत्कर्ष अभियानासाठी ७९ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शेतकरी सन्मान आणि ग्रामीण विकास प्रधानमंत्री किसान सन्मान निधी अंतर्गत ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात थेट ४.३ लाख कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. किसान क्रेडिट कार्ड योजनेंतर्गत सात कोटींहून अधिक शेतकऱ्यांना सुमारे १० लाख कोटी रुपयांची कर्ज सुविधा उपलब्ध झाली आहे.

शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन कर्ज मर्यादा तीन लाखांवरून पाच लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या "थेंब थेंबाने अधिक पीक" या अभियानामुळे १०९ लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले आहे. यामुळे पाण्याची बचत, उत्पादनवाढ आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्याचे सांगण्यात आले.

लखपती दीदी योजनेंतर्गत तीन कोटींहून अधिक महिलांना आर्थिक सक्षमीकरणाचा लाभ झाला आहे. सुकन्या समृद्धी योजनेद्वारे ४.५ कोटींहून अधिक खाती उघडण्यात आली आहेत. सुरक्षा दलांमध्ये महिला अधिकाऱ्यांची संख्या तीन हजारांवरून ११ हजारांपर्यंत वाढल्याने राष्ट्रीय सुरक्षेत महिलांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढला आहे.

२०१४मध्ये देशात ९१,२८७ किलोमीटर राष्ट्रीय महामार्ग होते. आज हे जाळे १.४६ लाख किमीपेक्षा अधिक झाले आहे. महामार्ग बांधणीचा वेग ११.६ किमी प्रतिदिनवरून ३४ किमी प्रतिदिनपेक्षा अधिक झाला आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत देशातील गावांमध्ये जवळपास आठ लाख किमी रस्त्यांचे जाळे निर्माण झाले असून त्यापैकी जवळपास चार लाख किमी रस्ते गेल्या १२ वर्षांत बांधण्यात आले आहेत. चिनाब रेल्वे पूल, नवीन पंबन पूल, अटल टनेल यांसारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांनी देशाच्या प्रगतीला नवी गती दिली आहे.

रेल्वेच्या ब्रॉडगेज विद्युतीकरणाचे ९९.६ टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झाले आहे. अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत १,३३७पेक्षा अधिक रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण सुरू आहे. आज देशात १६४हून अधिक वंदे भारत एक्स्प्रेस गाड्या कार्यरत असून आधुनिक रेल्वे सेवांचे प्रतीक बनल्या आहेत.

२०१४मध्ये केवळ पाच शहरांमध्ये असलेले २४८ किमी मेट्रो नेटवर्क आज २६पेक्षा अधिक शहरांमध्ये १,०९५ किमीपेक्षा जास्त विस्तारले आहे. गेल्या १२ वर्षांत ९०हून अधिक नवीन विमानतळे उभारण्यात आले असून देशातील एकूण विमानतळांची संख्या १६४पेक्षा जास्त झाली आहे. उडाण योजनेमुळे सर्वसामान्य नागरिकांनाही हवाई प्रवासाची संधी उपलब्ध झाली आहे.

डिजिटल इंडिया आणि ऊर्जा क्षेत्रातील क्रांती सौभाग्य योजनेंतर्गत प्रत्येक घरापर्यंत वीज पोहचविण्यात आली आहे. भारतनेट प्रकल्पाद्वारे २.१४ लाख ग्रामपंचायतींना ब्रॉडबँड इंटरनेटशी जोडण्यात आले आहे. डिजिटल व्यवहार, ऑनलाइन सेवा आणि पारदर्शक प्रशासनामुळे भारत डिजिटल परिवर्तनाचा जागतिक आदर्श ठरला आहे. गेल्या १२ वर्षांत २३ नवीन एम्स आणि वैद्यकीय महाविद्यालयांना मंजुरी देण्यात आली आहे. ईशान्य भारतातील जनतेची दीर्घकालीन मागणी पूर्ण करत आसाममध्ये पहिले एम्स सुरू करण्यात आले आहे.

मिशन इंद्रधनुष अंतर्गत ५४ कोटींहून अधिक मुलांना मोफत लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होण्यासाठी राजपथचे नामकरण कर्तव्य पथ असे करण्यात आले. इंडिया गेट परिसरात नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा भव्य पुतळा उभारण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित पंचतीर्थ विकसित करण्यात आले. भगवान बिरसा मुंडा यांची जयंती आदिवासी गौरव दिन म्हणून साजरी केली जात आहे. स्टॅच्यू ऑफ युनिटी, नवीन संसद भवन, राष्ट्रीय युद्ध स्मारक, अमृत उद्यान आणि पवित्र सेंगोल यांसारख्या उपक्रमांनी राष्ट्राभिमान अधिक बळकट केला आहे.

"वसुधैव कुटुंबकम" या भारतीय तत्त्वज्ञानाला मूर्त रूप देत भारताने जागतिक स्तरावर एक जबाबदार आणि विश्वासार्ह राष्ट्र म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. कोविड काळात "लस मैत्री" उपक्रमाद्वारे अनेक देशांना औषधे आणि लसींची मदत पुरविण्यात आली. ३९ नवीन दूतावास, वाढती परकीय गुंतवणूक आणि विविध मुक्त व्यापार करार हे भारतावरील जागतिक विश्वासाचे प्रतीक असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. आज १७७ देश आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करत असून भारतीय संस्कृतीचा जागतिक प्रभाव सातत्याने वाढत आहे, असेही या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले.

दरम्यान, पत्रकार परिषदेपूर्वी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या आवारात मंत्रीमहोदयांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले तसेच उरण नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष रवी भोईर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.



# पीरवाडी किनाऱ्यावर पोलीस आणि सुरक्षा यंत्रणांकडून दहशतवादविरोधी मॉक ड्रिल



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरणच्या पीरवाडी समुद्रकिनाऱ्यावर अचानकपणे पोलीस फौजफाटा आणि सुरक्षा दलाचे जवान यांची जमवाजमव करण्यात आली. अचानकपणे शस्त्रास्त्रासह एकत्र आल्याने दहशतवादी हल्ला घडला असावा असे चित्र निर्माण झाले होते. मुंबईपासून हाकेच्या अंतरावर व सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील असलेल्या उरण येथील पिरवाडीच्या समुद्रकिनाऱ्यावर उरण पोलिसांनी इतर सुरक्षा आस्थापनांच्या सहकार्याने शनिवारी (दि. १३) सकाळी १० ते १२:१५ वाजण्यादरम्यान हे प्रात्यक्षिक घेतले, अशी माहिती उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनिफ मुलाणी यांनी दिली.

या मोहिमेत पोलीस आणि सुरक्षा यंत्रणेला एका दहशतवाद्याला जिवंत पकडण्यात यश आले, तर दुसऱ्याला कंठस्नान घालण्यात आले. उरणच्या सागरी सुरक्षेच्या दृष्टीने पीरवाडी समुद्रकिनाऱ्यावरील लँडिंग पॉइंट या ठिकाणी हे मॉक ड्रिल घेण्यात आले. या ठिकाणी दहशतवाद्यांकडील शस्त्रे व दारूगोळा जप्त करण्यात आला. मृत दहशतवाद्याला रुग्णवाहिकेतून रुग्णालयात पाठविण्यात आले. याशिवाय एकाला पोलिसांनी ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी पोलीस ठाण्यात पाठविले.

या मॉक ड्रिलमध्ये जलद प्रतिसाद पथकाचे २५ अंमलदार, ओएनजीसी सीआयएसएफचा एक अधिकारी, पाच कर्मचारी, सिडको अग्निशमन दलाचे पाच अधिकारी व कर्मचारी, दोन वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, उरण वाहतूक शाखेचे दोन पोलीस अंमलदार, सागरी सुरक्षेचे दोन अधिकारी व एक पोलीस अंमलदार, बीडीडीएसचे चार पोलीस अंमलदार व मोरा सागरी पोलीस ठाणे येथील एक पोलीस अधिकारी व १० पोलीस अंमलदार, पाच होमगार्ड व सागरी सुरक्षा रक्षक दलाच्या पाच सदस्यांनी सहभाग घेतला होता.

## एसटी बसखाली उडी घेत अज्ञाताने केली आत्महत्या

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात कारणावरून अज्ञात इसमाने एसटी स्टँडजवळील ओरियन मॉलसमोरून जाणाऱ्या एसटी बसच्या मागील चाकाखाली उडी मारली. यात गंभीर दुखापत झाल्याने त्याला उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. ओरियन मॉलसमोरील पळस्पेकडे जाणाऱ्या लेनवरसमोरून जाणाऱ्या एसटी बसखाली अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून मागील चाकाखाली उडी मारली. त्यात तो गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी रवाना झाले असून मृत इसमाच्या नातेवाइकांचा शोध सुरू आहे. यासंदर्भात कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी उरण नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष रविशेठ भोईर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : एनडीए सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची १२ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संपूर्ण देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने मंत्री आशिष शेलार पनवेल येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आले असता खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी त्यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले.**

# प्रेयसीच्या निर्घृण हत्येप्रकरणी आरोपीसह दुसऱ्या प्रेमिकेला अटक

**पनवेल : वार्ताहर**

तब्बल दोन महिन्यांपूर्वी सापडलेल्या मृतदेहाची ओळख पटवून आरोपीला अटक करण्यात पनवेल तालुका पोलिसांना यश आले आहे. करण नामदेव पाटील (राहणार फडके पाडा, शिळफाटा ठाणे) असे आरोपीचे नाव आहे. अधिक तपासात या गुन्ह्यात आरोपीबरोबर त्याची दुसरी प्रेमिकादेखील सहभागी होती. तिलाही गुन्ह्यात वापरलेल्या चारचाकी गाडीसह पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

११ एप्रिल रोजी पनवेल तालुका पोलिसांना चिंचवलीजवळील पनवेल दुन्द्रे रस्त्याच्या वन विभागाच्या जागेत झुडपामध्ये एका अनोळखी महिलेचा मृतदेह सापडला होता. त्यानंतर पोलिसांनी आरोपीविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करून महिलेची ओळख पटवण्याचे काम सुरू केले. महिलेची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. आजूबाजूच्या गावांमध्ये जाऊन शोध घेतला, मात्र तिची ओळख पटली नाही. पोलिसांनी तब्बल २०० पेक्षा अधिक मिसिंग महिलांची पडताळणी केली. त्यासोबत तांत्रिक तपासही सुरू ठेवला. यावेळी हत्या झालेल्या महिलेच्या वर्णनासोबत एका महिलेची माहिती प्राप्त झाली आणि पोलिसांनी त्यानुसार तपास सुरू केला. यावेळी शीळ डायघर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अनिता देवी भगवान राजभर (३०) या महिलेची ओळख पटली. तालुका पोलिसांनी या महिलेच्या संपर्कात असलेल्या इसमाला ताब्यात घेतले.



त्याचा मोबाइल तपासला असता तो मयत महिलेच्या संपर्कात असल्याचे दिसून आले. तपासात समोर आले की अनिता देवी राजभर हिने त्याच्याकडे लग्नाचा तगादा लावला होता. तिच्याशी लग्न करायचे नसल्याने करण पाटील याने ६ एप्रिल रोजी तिच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारहाण करून तिची हत्या केली. नंतर तिचा मृतदेह कारमधून चिंचवली गावच्या हद्दीत आणून कारमधील पेट्रोल काढून ते तिच्या प्रेतावर टाकून तिला जाळून टाकले.

गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या तपासात पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, सहायक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस निरीक्षक आनंद कांबळे यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक दिपक शेळके, हर्षल राजपूत, अभिजीत व्हरांबळे, पोलीस अंमलदार सुनील कुदळे, आकाश भगत, शिवाजी बाबर, सतीश तांडेल, विजय देवरे, विकास साळवी, जयदीप पवार, भानुदास मोटे, भूषण म्हारसे, भीमराव खताळ आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे व गुप्त माहितीच्या आधारे आरोपीला गजाआड करण्यात यश मिळविले.

दरम्यान, अधिक तपासात आरोपीबरोबर त्याची दुसरी प्रेमिका सुरेखा सिंग (२१, राहणार शिळफाटा) हीदेखील सहभागी होती. तिच्यासमोरच सदर महिलेला जाळण्यात आले होते. या महिलेचा मृतदेह आणण्यासाठी आरोपीने वापरलेली मित्राची गाडी व लोखंडी रॉडदेखील पनवेल तालुका पोलिसांनी हस्तगत केला आहे.

## वडघरमध्ये १७ जूनला मोफत वह्यावाटप

**पनवेल** : स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकनचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी त्यांच्या मातोश्री सुमन साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम १७ जून रोजी आयोजित केला आहे. हा कार्यक्रम राजिप प्राथमिक शाळा, वडघर येथे होणार आहे.

कार्यक्रमाचे आयोजन पनवेल तालुका अध्यक्ष प्रशांत सोनावणे व पनवेल महानगरपालिका अध्यक्ष निलेश कांबळे यांनी केले आहे. दरवर्षी महेश साळुंखे पनवेल येथील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व्हावी म्हणून मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम राबवतात. त्याचाच एक भाग म्हणून यावर्षीही १७ जूनला ते त्यांच्या आईच्या स्मरणार्थ मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम घेणार आहेत. हा कार्यक्रम रायगड जिल्हा परिषदेच्या वडघर येथील प्राथमिक मराठी शाळेमध्ये होणार आहे.

## नवीन पनवेल सेक्टर १५ येथील उपकेंद्रात नवा ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल शहरातील वाढत्या वीज मागणीची पूर्तता करण्यासाठी महावितरणने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत सेक्टर १५ येथील ३३/११ केव्ही उपकेंद्रात १० MVA क्षमतेचा नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर यशस्वीरित्या कार्यान्वित केला आहे. या प्रकल्पामुळे वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम, विश्वासार्ह आणि कार्यक्षम होणार आहे.

पनवेल शहरातील सेक्टर-७ व सेक्टर १५ उपकेंद्रांवरील विद्यमान पॉवर ट्रान्सफॉर्मरवर गेल्या काही काळापासून वाढत्या वीज वापरामुळे अतिरिक्त भार पडत होता. विशेषतः उन्हाळ्यात एअर कंडिशनर व इतर विद्युत उपकरणांच्या वाढत्या वापरामुळे या भागातील वीज मागणीत मोठी वाढ झाली असून वीजपुरवठा खंडित



होण्याचा घटना घडल्यामुळे ग्राहकांना गैरसोयींचा सामना करावा लागला. ही परिस्थिती लक्षात घेऊन दीर्घकालीन उपाययोजना म्हणून महावितरणच्या सेक्टर १५ येथील उपकेंद्रात नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला आहे. नवीन ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित झाल्यानंतर त्याच दिवशी दुपारी ३ वाजता ११ केव्ही श्रेयस फिडरचा भार त्यावर यशस्वीरित्या वर्ग करण्यात आला. पुढील टप्प्यात ११ केव्ही सेक्टर ३ व ५ फिडर्सचा भारदेखील या ट्रान्सफॉर्मरवर घेण्यात येणार आहे.

## कामोठे येथून तरुणी बेपत्ता

**पनवेल** : राहत्या घरातून कोणालाही काही न सांगता एक तरुणी कुठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

मुस्कान रोशनलाल नौटीयाल (२०, राहणार कामोठे) उंची ५ फूट ४ इंच, रंग गोरा, केस व डोळे काळे, नाक सरळ, अंगाने सडपातळ आहे. तिच्या कानात रिंगा, नाकात चमकी असून अंगात डार्क ब्राऊन रंगाचा टी-शर्ट व लाईट ब्राऊन रंगाचा पायजमा आहे. तिच्या डाव्या हाताच्या मधल्या बोटात दोन अंगठ्या आहेत.

तिला मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा अवगत आहे. तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कामोठे पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार तुषार शिंदे, ८६५५३५४११४ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**उरण : येथील नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष रविशेठ भोईर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना वेश्वी ग्रामपंचायतीचे सरपंच अजित पाटील, माजी सरपंच विलास पाटील, भाजप कार्यकर्ते शरद ठाकूर, आकाश खैरे आदी.**

# शंकरा आय हॉस्पिटलची दमदार कामगिरी; २.३३ लाखांहून अधिक मुलांची नेत्रतपासणी



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुलांमधील नेत्रविकारांचे वेळीच निदान करून त्यावर उपचार करताना शंकरा आय हॉस्पिटलने रेनबो स्कूल स्क्रीनिंग प्रोग्राम अंतर्गत मोठी कामगिरी बजावली आहे. जून २०२२ ते मार्च २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेद्वारे भारतातील विविध भागांतील २.३३ लाखांपेक्षा जास्त शाळकरी मुलांची यशस्वी नेत्रतपासणी करण्यात आली.

या व्यापक उपक्रमाचा मुख्य उद्देश शाळकरी मुलांमधील दृष्टीसंबंधित समस्यांचे सुरुवातीच्या टप्प्यातच निदान करणे आणि त्यांना वेळेवर योग्य उपचार मिळवून देणे हा होता; जेणेकरून भविष्यातील संभाव्य अंधत्व आणि दृष्टीदोषांमुळे शिक्षणात येणारे अडथळे रोखता येतील. या मोहिमेच्या आकडेवारीनुसार प्रकल्प कालावधीत एकूण ५६३ शाळांमधील २ लाख ३३ हजार ३५७ मुलांची नेत्रतपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान अनेक मुलांमध्ये दृष्टिदोष आढळून आले. त्यावर तातडीने उपाययोजना करत दृष्टीदोष निवारणासाठी गरजू मुलांना ७ हजार ८०१ चष्म्यांचे मोफत वाटप करण्यात आले. याशिवाय डोळ्यांच्या गंभीर आजारांचे निदान झालेल्या ३२ मुलांवर यशस्वी शस्त्रक्रिया करून त्यांना दृष्टिदान देण्यात आले.

ठाणे, उरण, मुंबईसह आरोग्य सेवांपासून वंचित असलेल्या इतर दुर्गम भागांमध्येही ही विशेष नेत्रतपासणी मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली. यावेळी पनवेल येथील शंकरा आय हॉस्पिटलचे मुख्य वैद्यकीय अधिकारी आणि कॉर्निया तज्ज्ञ गिरीश शंकर बुधराणी म्हणाले, "दृष्टिदोष असलेल्या अनेक मुलांना स्वतःलाच हे समजत नाही की त्यांना स्पष्ट पाहण्यात अडचण येत आहे. याचा थेट परिणाम त्यांच्या शिक्षणावर, आत्मविश्वासावर आणि सर्वांगीण विकासावर होतो. शाळेत नियमितपणे केली जाणारी नेत्रतपासणी अशा समस्यांचे सुरुवातीच्या टप्प्यातच निदान करण्यास मदत करते.

रेनबो स्कूल स्क्रीनिंग प्रोग्रामच्या माध्यमातून मुलांपर्यंत दर्जेदार नेत्रचिकित्सा सेवा पोहचवणे आणि बालपणातील डोळ्यांच्या आरोग्याबाबत समाजात जनजागृती निर्माण करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे."

## आप्पासाहेब पवार यांच्या दोन कादंबऱ्यांचे प्रकाशन



**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल येथील तथास्तु हॉलमध्ये आप्पासाहेब पवार यांच्या "सुखाचे सोबती" व "प्रीतीसंगम" या कादंबऱ्यांचे प्रकाशन करण्यात आले.


कोकण मराठी साहित्य परिषद, शाखा पनवेल आणि के.गो.लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम कोमसाप पनवेल शाखेचे अध्यक्ष सुभाष कुडके यांनी प्रास्ताविक केले. पुस्तक-प्रकाशनानंतर मान्यवरांची समायोचित भाषणे झाली. समारंभाचे अध्यक्ष कोमसापचे विश्वस्त एल.बी.पाटील यांनी विचार मांडले.


लेखक आप्पासाहेब पवार यांनी आपल्या कादंबरी लेखनामागील भूमिका समजावून सांगितली. ज्येष्ठ साहित्यिक डॉ.अविनाश पाटील यांनी 'प्रीतीसंगम' कादंबरीचे रसग्रहण करताना त्यातील सौंदर्य-स्थळे उलगडून दाखवली. ज्येष्ठ साहित्यिका मीनल वसमतकर यांनी सातव्या शतकातील 'बाण भट्टाच्या' कादंबरीपासून आढावा घेत 'सुखाचे सोबती' या कादंबरीचा आशय, लेखन-शैली, पात्रयोजना, कथानकाची मांडणी, समाजाला दिलेला संदेश याबद्दल भाष्य केले. कोमसापचे केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी व ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी यांनी पुस्तकाचे अंतरंग, बहिरंग व मुखपृष्ठ याबद्दल माहिती दिली. ज्येष्ठ कवी, गझलकार व समीक्षक रोहिदास पोटे यांनी आप्पासाहेबांच्या कादंबऱ्या वास्तववादी, भावनाप्रधान व प्रणयप्रदान असल्याचे सांगितले. ज्येष्ठ साहित्यिक व कोमसाप माजी जिल्हाध्यक्ष ॲड. सुनीता जोशी यांनी आप्पासाहेबांनी प्रदीर्घ तरीही रोचक कादंबऱ्या लिहिल्याबद्दल कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रद्धा तारे यांनी केले व मान्यवरांचा परिचय करून दिला. उपस्थितांचे आभार शिवाजी मोटे यांनी मानले. यानंतर नागनाथ डोलारे यांच्या अध्यक्षतेखाली काव्यसंमेलन झाले. त्यात १४ कवींनी कविता सादर केल्या. कवयित्री रंजना करकरे, कोमसापचे सचिव विजय गायकर, ज्येष्ठ कवी वैशंपायन, दत्तात्रेय जाधव, वाचनालयाच्या सचिव जयश्री शेटे, राजकुमार ताकमोगे उपस्थित होते.

# लगान @२५ वर्षे

## क्लासिक चित्रपट, ऑस्करला नामांकन...







काळ १८९३चा. म्हणजे आपल्या अखंड हिन्दुस्थानचा. दीडशे वर्षांपूर्वीचा...

स्थळ आपल्या देशातील मध्य भागातील चंपानेर हे अतिशय दुर्गम भागातील रखरखीत उन्हाचे खेडेगाव. या खेड्यात जे पिकतेय ते विकले जाऊन गरीब शेतकऱ्यांची गुजरण सुरू आहे. अशातच एका वर्षी पाऊस खूपच लांबला आहे, शेतकरी आकाशाकडे डोळे लावून आहे, सुका दुष्काळ पडला आहे. पाऊस यावा यासाठी सगळे गावकरी मिळून प्रार्थना करतात. उत्पन्न नाही आणि अशातच शेतसारा (लगान) भरण्याची वेळ येते. तो भरायचा कसा हा मोठाच प्रश्न. इंग्रजकालीन काळ आहे. गावाबाहेर राहत असलेले इंग्रज क्रिकेट शौकीन आहेत. त्यांचा तो चेंडू फळीचा खेळ पाहून खेडूत अचंबित होतात. त्यांच्यासाठी हे सगळे कुतुहल निर्माण करणारे असते, पण याच इंग्रजांना क्रिकेट सामन्यात पराभूत केले तर त्यांना शेतसारा अर्थात लगान माफ केला जाईल असे इंग्रज अधिकारी सांगतो. ज्या खेळाची आपणास फारशी माहिती नाही तो खेळ आत्मसात कसा करायचा आणि या खेळात पारंगत असलेल्या इंग्रज संघाला पराभूत कसं करावं असा खेडुतांना प्रश्न असतो. यष्टी म्हणजे काय हेही त्यांना माहीत नाही, पण त्यांचा म्होरक्या भुवन (आमिर खान) हे आव्हान स्वीकारायचे ठरवतो. चेंडू फळीचा कसलाच अनुभव नसलेल्या एकेका शेतकऱ्याला हा खेळ समजावून सांगणे, त्याच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, त्याचा न्यूनगंड घालवणे, क्रिकेट खेळाची गोडी निर्माण करणे आणि या सगळ्यातून अकरा जणांचा क्रिकेट संघ तयार करणे या कामात भुवन स्वतःला झोकून देतो. आपल्या खेड्यातील खेडूताचा क्रिकेट संघ तयार करतो आणि मग हे खेडूत आणि इंग्रजांचा संघ असा क्रिकेट सामना रंगतो....

आमिर खान प्रॉडक्शनच्या आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'लगान' या चित्रपटाचे हे मध्यवर्ती कथासूत्र. १५ जून २००१ रोजी हा चित्रपट मुंबईत प्रदर्शित झाला, त्याला पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. मुंबईत या चित्रपटाचे मुख्य चित्रपटगृह इरॉस हे होते. याच चित्रपटाच्या स्पर्धेत झी सिनेमा निर्मित आणि अनिल शर्मा दिग्दर्शित 'गदर एक प्रेमकथा' हाही चित्रपट प्रदर्शित झाला. स्पर्धा जोरात होती. दोन्ही देशभक्तीवरील चित्रपट. 'लगान' एक काल्पनिक कथा, पण काय सांगावे, त्या काळात देशाच्या कोणत्या तरी भागात, गावात अशा पध्दतीने संघ रचना करून एकोप्याने इंग्रजांना पराभूत केले गेले असावे. खरंच असं घडलं असावं असा विश्वास हा चित्रपट पाहताना होतो हे दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर याचे यश. गदर एक प्रेमकथा हा १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारत आणि पाकिस्तान अशी फाळणी झाली त्यावरचा रक्तरंजित जोरदार शोरदार चित्रपट. दोन्ही देशभक्तीवरील चित्रपट आणि दोन्ही चित्रपटांना घसघशीत यश प्राप्त झाले. असा शुक्रवार सिनेमावाल्याना कायमच सुखावतो.

या चित्रपटाच्या निर्मितीची प्रक्रिया अगदी वेगळी. तशी ती जवळपास प्रत्येक चित्रपटाची वेगळीच असते. तो एका पुस्तकाचा अथवा. मालिकेचा विषय आहे.

आशुतोष गोवारीकरच्या दिग्दर्शनातील पहला नशा (१९९३) आणि बाजी (१९९५)नंतरचा हा चित्रपट. मुळात तो अभिनेता. मराठी व हिंदी चित्रपटातून भूमिका साकारत असतानाच त्याने दिग्दर्शनात पाऊल टाकले. 'लगान'ची तयारी सुरू करण्यापूर्वी त्याने हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात एक अभ्यासपूर्ण नजर टाकताना त्याच्या लक्षात आले, ग्रामीण जीवनावरील चित्रपट जनसामान्यांना जास्त भावतात. उदाहरणार्थ, चित्रपती व्ही शांताराम दिग्दर्शित दो आँखें बारह हाथ, बिमल रॉय दिग्दर्शित दो बिघा जमीन, नितीन बोस दिग्दर्शित गंगा जमुना, मेहबूब खान दिग्दर्शित मदर इंडिया, बी. आर. चोप्रा दिग्दर्शित नया दौर. वगैरे वगैरे. आशुतोष गोवारीकरने निर्णय घेतला आपल्या चित्रपटाची कथा ग्रामीण भागात घडेल. त्यातून त्याला 'लगान' चे कथासूत्र सुचलं. त्याने सर्वप्रथम ते आमिर खानला ऐकवलं, पण त्याला ते फारसं आवडलं नाही. म्हणून आशुतोष गोवारीकर शाहरुख खानला भेटला. शाहरुखने या चित्रपटातील भुवन साकारावा अशी आशुतोष गोवारीकरची इच्छा होती, पण त्याला हे कथानक फारसं काही आवडलं नाही. आशुतोषने कथा विस्तार करत पुन्हा आमिर खानची भेट घेतली आणि आमिर खानने होकार दिला. खरंतर आमिर खान आपले पिता ताहिर हुसैन यांच्या टी.व्ही. फिल्म या बॅनरखाली 'लगान' निर्माण करू शकला असता (ताहिर हुसैन यांनी रघुनाथ झालानी दिग्दर्शित अनामिका, राजा ठाकूर दिग्दर्शित जख्मी अशा अनेक चित्रपटांची निर्मिती केली आहे), पण त्याने आमिर खान प्रॉडक्शन या निर्मिती संस्थेची स्थापना केली आणि लगानच्या निर्मिती प्रक्रियेची बहुस्तरीय सुरुवात झाली. सर्वप्रथम पटकथा संवाद लेखन, मग विषयानुसार चित्रीकरणाचे स्पॉट आणि आमिर खानची नायिका आणि अन्य कलाकारांची निवड. ते अनेक आहेत.

आमिर खानची नायिका कोण हा फार महत्त्वाचा झालेला प्रश्न. बरेच दिवस रानी मुखर्जीचे नाव चर्चेत होते. विक्रम भट्ट दिग्दर्शित 'गुलाम'(१९९८) मध्ये ही जोडी छान जमली, शोभली आहे आणि पिक्चर सुपर डुपर हिट ठरल्याने रानी मुखर्जीला नवीन ऑफर येणं अगदी स्वाभाविक. 'लगान' साठी भरपूर तारखा द्यायला हव्यात. ते कसं जमणार? आणि बरेच दिवस चित्रीकरण आहे म्हटल्यावर आघाडीची अभिनेत्री मिळणं अवघड. त्यापेक्षा नवीन चेहरा निवडला तर? ग्रेसी सिंगची निवड करण्यात आली. तिने तोपर्यंत एखाद्या मालिकेत आणि हम आपके दिल में रहते है (१९९९) या चित्रपटात छोटी भूमिका साकारली होती. आमिर खानची नायिका ही तिच्यासाठी मोठीच संधी.

कला दिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई यांनी गुजरात राज्यातील कच्छ भागात भूजपासून सोळा किलोमीटर अंतरावरील कुनारिया गावात भला मोठा सेट लावला आणि लगानचे चित्रीकरण सुरू झाले. या चित्रपटाची पटकथा आशुतोष गोवारीकर, कुमार देव आणि संजय दायमा यांची, छायाचित्रण अनिल मेहता यांचे तर संकलन बल्लू सलुजा यांचे, वेशभूषा भानू अथ्थया यांची! भले मोठे युनिट घेऊन चित्रपट आकार घेत घेत गेला. चित्रपटातील विदेशी कलाकार रैचेल शैली, पॉल ब्लॅकथार्न हे हिंदीत न बोलता (अर्थात डब करून) इंग्रजीतच बोलतील आणि ते स्वाभाविक ठरेल असे आशुतोष गोवारीकरला मनोमन वाटले. या चित्रपटातील गाणी जावेद अख्तर यांनी लिहिली आणि ए.आर. रेहमान यांचे संगीत आहे आणि सगळीच गाणी श्रवणीय. घनन घनन, मितवा, राधा कैसे जले, ओ रे छोरी, चलो चलो, ओ पालन हारे... पटकथेच्या ओघात गाणी येतात आणि चित्रपट पुढे सरकत सरकत जातो. येथेही दिग्दर्शक दिसतो.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठी महालक्ष्मी येथील फेमस स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये 'लगान' च्या खास खेळाचे आयोजन करण्यात आले... सेन्सॉर प्रमाणपत्र झाले आणि अमिताभ बच्चनच्या धीरगंभीर आवाजात निवेदन सुरू होते आणि आपण या चित्रपटात गुंतत गुरफटत जातो. एका वेगळ्या प्रकारच्या अनुभवात शिरतो, एक सकस कलाकृती आपण पाहतोय आणि त्यात आपले मनोरंजनही होत आहे याची जाणीव होत होत जाते.

नवीन दशकाच्या सुरुवातीला चित्रचौकटीचा भन्नाट अनुभव या चित्रपटाने दिला आणि मुंबईत इरॉस चित्रपटगृहाबाहेर अनेक आठवडे हाऊसफुल्लचा फलक दिसू लागला.

...आणि एक दिवस बातमी आली, ऑस्कर पुरस्कारासाठीची भारतीय चित्रपटाची अधिकृत प्रवेशिका म्हणून 'लगान' ची निवड झाली. तशी ती निवड दरवर्षी व्हायची, वृत्तपत्रात पहिल्या पानावर बातमी यायची. पण पुढे काय? आशुतोष गोवारीकर स्वतः अमेरिकेत गेला. त्याने ऑस्करच्या परीक्षकासाठी कशा पद्धतीने शोचे आयोजन करण्यात येते, त्याचे गुण कसे दिले जातात, वगैरे कार्यपद्धती समजून घेतली. तो याबाबत सकारात्मक दृष्टिकोनातून वाटचाल करीत असताना आमिर खान अमेरिकेत गेला. तोपर्यंत कदाचित त्याला वाटले असेल, लगान ऑस्करच्या शर्यतीत मागे पडेल. प्रत्यक्षात मात्र ऑस्करच्या विदेशी चित्रपटाच्या अंतिम फेरीत नामांकन मिळाले आणि एक महत्त्वाचे असे पुढचं पाऊल पडले. हा एकूणच भारतीय चित्रपटाचा गौरव होता. पाच विदेशी चित्रपटांत 'लगान' होता.

ऑस्करचा सोहळा अमेरिकेत सुरू होतो, तेव्हा आपल्या देशात पहाट सुरू झालेली असते. लगानला विदेशी चित्रपटांत पुरस्कार प्राप्त व्हावा अशी चित्रपटसृष्टी आणि चित्रपट रसिकांची मनापासून इच्छा होती, लगानची टीम आमिर खानच्या कार्यालयात पहाटेपासून दूरचित्रवाणीवर डोळे लावून बसली, पण पुरस्कार हुकला.

लगानची ही झेप विशेष उल्लेखनीय आहे. तोपर्यंत ऑस्करच्या शर्यतीत विदेशी चित्रपट विभागात मेहबूब खान दिग्दर्शित मदर इंडिया आणि मीरा नायर दिग्दर्शित सलाम बॉम्बे या दोन हिंदी चित्रपटांनी मजल मारली होती.

लगान हा एकूणच भारतीय चित्रपटसृष्टीतील एक माईल स्टोन चित्रपट आहे. एक क्लासिक अनुभव आहे. उत्तम आशय ( सांघिक भावना असावी) आणि मनोरंजन यांचा यात उत्तम ताळमेळ आहे. हा चित्रपट तीन तास, चव्वैचाळीस मिनिटे आणि एकोणतीस सेकंद असा लांबलचक असूनही तो आपल्याला पडद्यावरील विश्वात रममाण करतो हे दिग्दर्शक आशुतोष गोवारीकरचे यश. लगान वन्स अपॉन ए टाईम इन इंडिया असे नामकरण करण्यात येऊन हा एका विशिष्ट कालखंडावरचा चित्रपट आहे हे अधोरेखित केले हे उत्तम.

# चला, पाल्यांना मराठी शाळेत घालूया!




जून महिना उजाडला की नव्या शैक्षणिक वर्षाची चाहूल लागते. घराघरांत मुलांच्या शाळा प्रवेशाची लगबग सुरू होते. आपल्या पाल्याला कोणत्या शाळेत प्रवेश द्यावा, हा प्रत्येक पालकासमोरील महत्त्वाचा प्रश्न असतो. अशा वेळी एक मराठी माणूस, एक जबाबदार पालक आणि आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगणारा नागरिक म्हणून आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे "आपल्या मुलाला जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत प्रवेश का देऊ नये?"

आज आपल्या राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक, माध्यमिक शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्तम शिक्षक, आधुनिक सुविधा आणि संस्कारक्षम वातावरण यामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहेत. याला आणखी उंचीवर पोहचविण्यासाठी आवश्यक आहे तो पालकांचा विश्वास आणि पालक म्हणून आपला सक्रिय सहभाग! केवळ अफवा आणि यंत्रणेसंदर्भातील नकारात्मक दृष्टिकोन यामुळे ग्रामीण भागातील कमी खर्चाची, योग्य गुणवत्तेची आणि संस्कार करणारी एक यंत्रणा आम्ही कमकुवत तर करत नाही ना ? हा प्रश्न एकदा स्वतःला विचारणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात आतापर्यंत इतिहास घडवला तो जिल्हा परिषदेच्या शाळांनी.या शाळांमधून आजचे उच्चपदस्थ अधिकारी, शास्त्रज्ञ, डॉक्टर, वकील, कवी, लेखक, कृषीतज्ज्ञ, समाजसुधारक तयार झाले आहेत. विशेषतः मराठी माध्यमातू शिकूनही ते कुठेही गुणवत्तेत मागे पडलेले नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण आमच्या अनेक पिढ्यांनी अनुभवले आहे. अपार कष्ट,अवहेलना सहन करून अशा शाळांमधून शिक्षण घेत त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. देशातील मोठमोठ्या संस्थांवरचे गुणवान जिल्हा परिषदेच्या शाळांमधूनच तयार झाले आहे. त्यामुळे आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या आणि विशेषतः जिल्हा परिषद शाळांच्या दारी नेण्याची हीच योग्य वेळ आहे.

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची निवड अत्यंत पारदर्शक आणि गुणवत्तेच्या निकषांवर आधारित असते. शिक्षक पात्रता परीक्षा (TET), विविध स्पर्धात्मक प्रक्रिया, शैक्षणिक गुणवत्ता आणि शासनाने ठरवून दिलेल्या नियमांच्या आधारे शिक्षकांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे समाजातील गुणवंत, प्रशिक्षित युवकच शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसमोर उभे राहतात. जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या गुणवत्तेची वेळोवेळी तपासणी होते. प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे या शाळांमध्ये अप्रशिक्षित शिक्षक हा प्रश्न निकाली निघाला आहे.

शिक्षक हे राष्ट्रनिर्माते असतात. आपल्या गुरु शिष्य प्राचीन परंपरेला याच शाळा पुढे घेऊन गेल्या आहेत. येथील शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, संस्कारांसाठी, देशाच्या आधुनिक शैक्षणिक धोरणांशी जोडले गेले असतात. त्यामुळे शासकीय शैक्षणिक संस्था अर्थात आपल्या शाळा जबाबदार नागरिक घडविणारी यंत्रणा म्हणून पुढे आल्या आहेत.

शैक्षणिक संशोधन सातत्याने सांगते की, मुलांचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेत झाले तर त्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती आणि सर्जनशीलता अधिक चांगल्या प्रकारे विकसित होते. मराठी माध्यमातून शिकणारी मुले केवळ भाषा शिकत नाहीत, तर आपल्या संस्कृतीशी, इतिहासाशी, परंपरांशी, वारशाशी आणि सामाजिक मूल्यांशी जोडली जातात.

मराठी भाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. ते आपले विचार स्पष्टपणे व्यक्त करू शकतात. इंग्रजी व अन्य भाषा शिकणे आवश्यक आहेच; परंतु शिक्षणाचा पाया मातृभाषेत असणे अधिक परिणामकारक असल्याचे अनेक जागतिक तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना शासनाकडून नियमित व पूर्ण वेतन दिले जाते. त्यामुळे त्यांचे संपूर्ण लक्ष अध्यापन, विद्यार्थ्यांचा विकास आणि शाळेच्या प्रगतीकडे केंद्रित राहते. काही समर्पित शिक्षक स्वतःच्या खर्चातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देतात, विविध उपक्रम राबवितात आणि गावोगावी शिक्षणाची ज्योत तेवत ठेवतात. साने गुरुजींच्या महाराष्ट्रात आजही अनेक ठिकाणी शिक्षकांच्या नावाने ती शाळा ओळखल्या जातात.

आज अनेक जिल्हा परिषद शाळांनी डिजिटल वर्गखोल्या, संगणक शिक्षण, विज्ञान प्रयोगशाळा, ई-लर्निंग सुविधा, क्रीडा साहित्य आणि विविध नवोपक्रमांच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे.सेमी इंग्लिश शिक्षण पद्धती शाळांनी अवलंब केली आहे.शालेय व्यवस्थापन समिती आणि माझी विद्यार्थी मंडळाकडून अनेक सुधारणा होत आहे.

राज्याचे शैक्षणिक धोरण ; मातृभाषेचे महत्त्व

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तसेच महाराष्ट्र शासनाचे शैक्षणिक धोरण प्राथमिक स्तरावर मातृभाषेत शिक्षण देण्याला विशेष महत्त्व देते. मुलांचा बौद्धिक विकास, भाषिक कौशल्ये आणि संकल्पना समजून घेण्याची क्षमता वाढविण्यासाठी मातृभाषा हे सर्वात प्रभावी माध्यम असल्याचे या धोरणांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.याच विचारातून महाराष्ट्रातील मराठी शाळांना अधिक सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण बनविण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. विशेष म्हणजे कला, क्रीडा, स्पर्धा परीक्षा या संदर्भातील मुलांच्या विकासाची यंत्रणा, श्रृंखला याच शाळांमध्ये पूर्ण होते. इथे निधी अभावी कधीही विद्यार्थ्यांच्या खिशातून पैसा काढून स्पर्धा घेतली जात नाही, रद्द होत नाही,पुढे ढकलली जात नाही. क्रीडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विज्ञान प्रदर्शनी, शिक्षकांचे प्रशिक्षण एकदा ठरले की पूर्ण केले जाते. राज्याच्या बाल कल्याण धोरणाला, बौद्धिक धोरणाला याच व्यासपीठावर राबविले जाते. त्यामुळे या यंत्रणेतून आपण बाद तर होत नाही ना? याचा विचार व्हावा.

एक काळ असा होता की काही पालकांना जिल्हा परिषद शाळा म्हणजे ग्रामीण भागातील भक्कम पर्याय वाटत असे. मात्र, अफवा, गैरसमज,आणि काही अपवादात्मक घटनांनी या शाळा मधल्या काळात ओस पडायला लागल्या होत्या. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांनी आपल्या गुणवत्तेमुळे वेगळी ओळख निर्माण केली आहे.सातारा, कोल्हापूर, पुणे, सिंधुदुर्ग, नाशिक, नागपूर, जळगाव आणि इतर अनेक जिल्ह्यांतील काही जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशासाठी पालकांची मोठी मागणी दिसून येते.अनेक शिक्षकांनी आपल्या दायित्वातून,गुणवत्तेतून,कल्पकतेतून शाळांना नवी ओळख दिली आहे. डिजिटल शिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संस्कारक्षम वातावरण आणि विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट निकाल यामुळे या शाळांवर पालकांचा विश्वास वाढत आहे.

काही ठिकाणी अपवादात्मक शाळांच्या जीर्ण इमारती व आवश्यक सोयीसुविधांची कमतरता दिसते. त्यामुळे पालकांनी केवळ भौतिक सुविधा बघून शाळांबाबत भूमिका बनविणे अयोग्य आहे. गरिबातील गरीब विद्यार्थ्यापासून सर्वांना शिक्षण मिळावे, अशी समतोल भूमिका शासनाची आहे. त्यामुळे अतिशय माफक शुल्कामध्ये या शाळेतील शिक्षण मुलांना घेता येते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक ॲप शाळांनी विकसित केले आहे. शिक्षकांना जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडावे लागत आहे. निपुण शाळा या मोहिमेतून शाळातील शिक्षणावर नियंत्रण ठेवले जात आहे. तिसऱ्या वर्गापासून प्रज्ञाशोध परीक्षा, चौथी व सातवीत होणारी स्कॉलरशिप परीक्षा, टॅलेंट सर्च परीक्षा, शालेय गणवेष, शालेय पोषण आहार, सगळ्यांना मोफत पुस्तके, केळी व अंडी वाटप, मुलींसाठी दैनिक भत्ता, मुलींना स्वतंत्र स्वच्छतागृह, सॅनेटरी नॅपकीनची उपलब्धता, प्रवेश उत्सव, संस्कार शिबिर अशा विविध उपक्रमांना शाळेत राबविण्यात येते. पहिलीपासून इंग्रजी अनिवार्य केले आहे. त्यामुळे इंग्रजी पासून कोणी वंचित राहत नाही. प्रत्येक जिल्ह्यातील काही शाळा सेमी इंग्लिश झाल्या आहेत. याशिवाय या सर्व यंत्रणेवर पालकांच्या पाच समित्यांचे नियंत्रण असते.त्यामुळे बाह्य चकाकी व इंग्रजी माध्यमांच्या आग्रहातून मुले दर्जेदार प्रशिक्षित शिक्षकांपासून, शिक्षणापासून वंचित राहू नये यावर विचार करण्याची ही गरज आहे.

आपल्या मुलाला मराठी शाळेत प्रवेश देणे म्हणजे केवळ एका शाळेची निवड नव्हे; तर आपल्या भाषेवर, संस्कृतीवर आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेवर व्यक्त केलेला विश्वास आहे. पालक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, तलाठी, नगरसेवक, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षण तज्ज्ञ या सर्वानीच ही बाब अधोरेखित करावी. अनियंत्रित खासगी यंत्रणेचे फटके समाज व्यवस्थेला बसत असताना, शिक्षणाची ही मूळ साखळी पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन शाळांना, शाळेच्या यंत्रणेला बळकट करणे आवश्यक आहे.

यंदाच्या शैक्षणिक वर्षात आपल्या गावातील, परिसरातील जिल्हा परिषद शाळेला भेट द्या. तेथील शिक्षकांशी संवाद साधा. शाळेच्या सुविधा पाहा. विद्यार्थ्यांचे यश जाणून घ्या. आणि मग आपल्या पाल्याच्या भविष्यासाठी विचारपूर्वक निर्णय घ्या. आमचे आई-वडील, आम्ही आणि आमची मुले जिल्हा परिषदेच्या शाळेतच शिकलेलो आहे. त्यामुळे यावर्षी निर्धारपूर्वक ठरवूया, आपल्या पुढच्या पिढीतील पाल्यांना मराठी शाळेत घालूया. मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांचा अभिमानाने वारसा पुढील पिढीकडे सुपूर्द करूया!

**-प्रवीण टाके,** उपसंचालक,
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

# मानवतेचा एक थेंब रक्त द्या, जीव वाचवा!



रक्तदान हे मानवतेचे सर्वोच्च दान मानले जाते. एका रक्तदात्याच्या रक्तदानामुळे तीन ते चार रुग्णांना नवजीवन मिळू शकते. त्यामुळे स्वैच्छिक, विना मोबदला आणि नियमित रक्तदानाची चळवळ समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचविणे ही आजची अत्यंत महत्त्वाची गरज आहे.

रक्तदान क्षेत्रातील आधुनिक वैद्यकशास्त्राची भक्कम पायाभरणी करणारे महान शास्त्रज्ञ कार्ल लँडस्टायनर यांनी सन १९००मध्ये ABO रक्तगट प्रणालीचा शोध लावला. त्यांच्या या क्रांतिकारी संशोधनामुळे सुरक्षित रक्त संक्रमण शक्य झाले आणि वैद्यकीय क्षेत्रात नवे पर्व सुरू झाले. त्यांच्या जन्मदिनानिमित्त १४ जून हा दिवस जगभर "जागतिक रक्तदाता दिन" म्हणून साजरा केला जातो. या वर्षीचे शासनाचे घोषवाक्य आहे- "मानवतेचा एक थेंब रक्त द्या, जीव वाचवा" (One Drop of Humanity, Give Blood, Save Lives).

अपघातग्रस्त रुग्ण, मोठ्या शस्त्रक्रिया, कर्करोगग्रस्त रुग्ण, थॅलेसेमिया व हिमोफिलिया बाधित रुग्ण, गंभीर रक्तक्षय असलेले रुग्ण तसेच प्रसूतीदरम्यान रक्तस्राव झालेल्या मातांचे जीवन अनेकदा रक्तदात्यांवर अवलंबून असते. आधुनिक वैद्यकीय उपचारांमध्ये रक्ताबरोबरच प्लाझ्मा, प्लेटलेट्स आणि इतर रक्तघटकांच्या दानाचीही मोठ्या प्रमाणात आवश्यकता भासत आहे. रक्तदान ही केवळ वैद्यकीय गरज नसून सामाजिक बांधिलकी, राष्ट्रीय कर्तव्य आणि मानवतेची सर्वोच्च अभिव्यक्ती आहे.

रक्तदानामुळे दात्याचे कोणतेही नुकसान होत नाही. उलट नियमित आरोग्य तपासणीची संधी मिळते तसेच समाजोपयोगी कार्य केल्याचे आत्मिक समाधान लाभते. देशातील रक्तसुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी युवक-युवतींनी नियमित रक्तदानासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. निरोगी युवक हे देशाच्या सुरक्षित रक्तपुरवठ्याचे खरे आधारस्तंभ आहेत. महिलांनीही वैद्यकीय निकष पूर्ण करून रक्तदानात सक्रिय सहभाग नोंदवावा. महिला रक्तदात्यांचा वाढता सहभाग हा समाजातील सकारात्मक परिवर्तनाचे प्रतीक आहे.

डिजिटल युगात सोशल मीडिया हे रक्तदान जनजागृतीचे प्रभावी माध्यम ठरले आहे. रक्तदान शिबिरांची माहिती प्रसारित करणे, गरजू रुग्णांना तातडीची मदत मिळवून देणे, नवीन रक्तदाते नोंदविणे आणि रक्तदानाविषयीचे गैरसमज दूर करणे यासाठी सोशल मीडियाचा सकारात्मक वापर होणे आवश्यक आहे.रक्तदाते हे समाजाचे खरे जीवनदाते आहेत. त्यांच्या निस्वार्थ योगदानामुळे हजारो कुटुंबांना आशेचा किरण मिळतो. त्यामुळे रक्तदात्यांचा गौरव, सन्मान आणि प्रोत्साहन ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. मात्र रक्तदान हे कोणत्याही प्रकारच्या आर्थिक लाभ, भेटवस्तू किंवा प्रलोभनासाठी नसून केवळ मानवतेच्या भावनेतून केले गेले पाहिजे. स्वैच्छिक व विना मोबदला रक्तदान हीच सुरक्षित रक्तपुरवठ्याची सर्वात विश्वासार्ह गुरूकिल्ली आहे.

**रक्तदान चळवळीची प्रमुख उद्दिष्टे**

✻ स्वैच्छिक व विना मोबदला रक्तदानाला प्रोत्साहन देणे.

✻ सुरक्षित रक्त व रक्तघटकांची सर्वांना उपलब्धता सुनिश्चित करणे.

✻ युवक व महिलांना नियमित रक्तदाता म्हणून प्रेरित करणे.

✻ रक्तदानाविषयीचे गैरसमज आणि भीती दूर करणे.

✻ दुर्मीळ रक्तगट असलेल्या रक्तदात्यांची माहिती संकलित करून त्यांचे प्रभावी नेटवर्क तयार करणे.

✻ सोशल मीडियाच्या माध्यमातून रक्तदात्यांचे जाळे अधिक मजबूत करणे.

✻ रक्तपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम व कार्यक्षम करणे.

✻ समाजात मानवता, बंधुता आणि सामाजिक जबाबदारीची भावना दृढ करणे.

चला, १४ जून जागतिक रक्तदाता दिनानिमित्त नियमित रक्तदानाचा संकल्प करूया आणि मानवतेच्या या महान कार्यात सहभागी होऊन अनेकांना नवजीवन देऊया.

**-हेमकांत सोनार,** रक्तपेढी तंत्रज्ञ, रक्तकेंद्र, अलिबाग-रायगड

# पावसाळ्यापूर्वी घरांना ताडपत्रीचे कवच; अलिबागसह रायगडात विक्रेत्यांचा व्यवसाय तेजीत

## घरगळती रोखण्यासाठी नागरिकांची लगबग; विशिष्ट आकाराच्या ताडपत्रींना मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मान्सून वेळेत दाखल होण्याचा हवामान खात्याचा अंदाज जाहीर झाल्यानंतर रायगड जिल्ह्यात पावसाळी पूर्वतयारीला वेग आला आहे. घरगळती, भिंतींमध्ये झिरपणारी ओल आणि घरातील साहित्याचे नुकसान टाळण्यासाठी नागरिकांकडून घरांवर ताडपत्री टाकण्याची लगबग सुरू झाली आहे.



परिणामी प्लास्टिक ताडपत्री विक्रेते, हार्डवेअर दुकानदार आणि संबंधित व्यवसायांना चांगलीच चालना मिळाली आहे.अलिबाग, मुरूड, रोहा, पेण, पनवेल आदी तालुक्यांतील किनारपट्टी व ग्रामीण भागात कौलारू घरे, पत्र्यांची घरे, गोठे तसेच शेती साहित्य झाकण्यासाठी ताडपत्रीची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. स्थानिक विक्रेत्यांच्या माहितीनुसार, गेल्या आठवड्याभरात ताडपत्रीच्या विक्रीत सुमारे ६० टयांनी वाढ झाली आहे.विविध आकारांच्या ताडपत्रींना मागणी

बाजारात ६x८, ९x१२ आणि १२x१५ फूट आकारांच्या ताडपत्रींना सर्वाधिक मागणी असून ९० GSM ते २०० GSM दर्जाच्या ताडपत्री ३०० रुपयांपासून ते २५०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. निळ्या रंगाच्या सिलपॉलिन ताडपत्रींना ग्राहकांकडून विशेष पसंती दिली जात आहे.रेवदंडा येथील शेतकरी तेजस शिंदे म्हणाले, "गेल्या वर्षी ऐन पावसाळ्यात घरगळतीमुळे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे यंदा पावसाळ्यापूर्वीच ताडपत्रीची व्यवस्था केली आहे. थोडे पैसे वाचवण्याच्या नादात मोठे नुकसान परवडणारे नाही.

हार्डवेअर दुकाने, आठवडी बाजार तसेच रस्त्यांच्या कडेला ताडपत्री विक्रीचे स्टॉल उभे राहू लागले आहेत. ताडपत्रीसोबतच बांबू, सुतळी, खिळे आणि दोरखंड यांच्या विक्रीतही कमालीची वाढ झाली आहे. काही विक्रेत्यांनी थेट घरांवर ताडपत्री बांधून देण्याची सेवा सुरू केली असून त्यासाठी २०० ते ५०० रुपये मजुरी आकारली जात आहे.

# पाऊस लांबल्याने शेतकऱ्यांपुढे आता दुबार पेरणीचे संकट

**माणगाव : प्रतिनिधी**

रोहिणी नक्षत्राच्या मुहूर्तावर माणगाव तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी भातपिकाची पेरणी पूर्ण केली असली, तरी अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने बळीराजाची नजर आकाशाकडे खिळून राहिली आहे. जून महिन्याचा मध्य जवळ आला तरी पावसाने अपेक्षित हजेरी लावलेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. गतवर्षी मे महिन्यातच दमदार पावसाची सुरुवात झाल्याने भातपिकाच्या कामांना वेग आला होता. यंदा मात्र चित्र पूर्णपणे वेगळे आहे. पेरणीची बहुतांश कामे पूर्ण झाली असली, तरी पावसाअभावी उगवण, रोपांची वाढ आणि पुढील शेती नियोजनाबाबत शेतकरी साशंक आहेत.

महाड, तळा, रोहा आणि परिसरातील अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांनी भातपेरणी पूर्ण केली आहे. काही ठिकाणी पेरणीच्या अंतिम टप्प्यातील कामे सुरू आहेत. मात्र पेरणीनंतर आवश्यक असलेला सातत्यपूर्ण पाऊस न पडल्याने बीजांकुरण आणि रोपांच्या वाढीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने बियाणे, खते, मशागत आणि मजुरीवर खर्च केला आहे. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे हा खर्च वाया जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पावसाने आणखी दिरंगाई केल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

माणगाव आणि तळा तालुक्यासह अनेक भागांमध्ये पावसाअभावी शेतीशी संबंधित विविध कामे अर्धवट राहिली आहेत. शेतजमिनींमध्ये आवश्यक ओलावा नसल्याने मशागत, खत व्यवस्थापन आणि अन्य कामांना अडथळे निर्माण होत आहेत. पावसावरच संपूर्ण हंगामाचे भविष्य अवलंबून असल्याने शेतकरी दिवसेंदिवस अधिक चिंतेत पडत आहेत. शेतकरी वर्गाचे म्हणणे आहे की, सुरुवातीला पेरणीसाठी अनुकूल वातावरण तयार झाले होते. मात्र त्यानंतर पावसाने अचानक दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या सर्व गणितांवर पाणी फेरले आहे. आता जोरदार आणि सातत्यपूर्ण पावसाची प्रतीक्षा सर्वांनाच लागून राहिली आहे.
घाटमाथा आणि ग्रामीण भागात पाणीसाठे अद्याप पुरेशा प्रमाणात भरलेले नसल्याने गावकरी आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनत आहे. विहिरी, ओढे आणि लहान जलस्त्रोतांमध्ये पाणी कमी असल्याने ग्रामस्थ आणि पशुपालकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. शेतीबरोबरच पशुधनाच्या संगोपनाची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

कोकणातील शेती ही पूर्णपणे मान्सूनवर आधारित आहे. पावसाने वेळेवर साथ दिली तर शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलते; मात्र पावसाने पाठ फिरवली तर संपूर्ण वर्षभराचे आर्थिक गणित बिघडते. त्यामुळे सध्या प्रत्येक शेतकऱ्याची नजर आकाशाकडे लागली असून "कधी बरसणार मेघराजा?" हा प्रश्न सर्वांच्या मनात घर करून बसला आहे.

कृषी विभागाने शेतकऱ्यांना घाईघाईने अतिरिक्त खर्च न करण्याचा तसेच हवामान विभागाच्या अंदाजांवर लक्ष ठेवण्याचा सल्ला दिला आहे. परिस्थितीनुसार योग्य नियोजन करून शेतीची कामे करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

अडचणी, संकटे आणि चिंतेचे ढग दाटले असले तरी कोकणातील शेतकरी आशावादी आहे. निसर्गावर अढळ विश्वास ठेवून बळीराजा अजूनही पावसाच्या प्रतीक्षेत आहे. काळ्या ढगांच्या आगमनासह शिवार हिरवागार होईल, भातखाचरे डोलू लागतील आणि मेहनतीच्या घामाला यशाचे रूप मिळेल, या आशेवरच शेतकरी नव्या हंगामाची स्वप्ने पाहत आहे. पेरणी पूर्ण झाली असली तरी आता पावसाची खरी कसोटी आहे.

# सागमळा वॉर्ड क्रमांक ४मधील रस्ते विकासकामांचे लोकार्पण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीतील सागमळा वॉर्ड क्रमांक ४ मधील कोलाड गल्ली व नाईक गल्ली येथील रस्ते विकासकामांचे लोकार्पण शुक्रवारी सकाळी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या विकासकामांच्या लोकार्पण सोहळ्यास रायगड जिल्हा परिषद सदस्य सचिन राऊळ तसेच पंचायत समिती सदस्या अंकिता घरत यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक विधी व भूमिपूजनाने करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी रस्ते विकासकामांमुळे स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीस मोठा दिलासा मिळणार असल्याचे सांगितले. अनेक वर्षांपासून परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या रस्त्यांच्या समस्येवर यामुळे तोडगा निघणार असून परिसराच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. लोकार्पणानंतर सत्कार समारंभात ग्रामस्थांच्या वतीने मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

# १५ जूनपासून शाळा सुरू; नवीन अभ्यासक्रमाच्या पुस्तकांसाठी प्रतीक्षा

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील मराठी व इंग्रजी माध्यमातील शाळांमध्ये अद्याप नवीन पाठ्यपुस्तके उपलब्ध झालेली नाहीत. १५ जूनपासून शाळा सुरू होत असल्याने पालकवर्गात संभ्रम निर्माण झाला आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या नवीन अभ्यासक्रमाला मंजुरी दिली असली तरी पाली परिसरात पुस्तकांचा तुटवडा असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (NEP) तयार करण्यात आलेला हा अभ्यासक्रम जून २०२६ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. बालभारतीतर्फे नवीन पाठ्यपुस्तके तातडीने उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले असून शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्गांचे आयोजनही करण्यात येणार आहे.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत सहावीच्या अभ्यासक्रम आराखड्याला राज्यस्तरीय सुकाणू समितीने हिरवा कंदील दाखवला आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस आमचे अशिल सौ. झरीना आसिफ शेख आणि श्री. सैद आमिर खलील यांचे तर्फे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांचे आजोबा पैगंबरवासी श्री. हाजी अब्दुल आझाद @ अहाद बुखारी यांचे नांवे असलेल्या सर्वे नं.२४, हिस्सा न. १, मोजमाप ० हेक्टर, ५० गुंठे, ३ पॉइंटस, मौजे करवले (बुद्रुक), ता. पनवेल जि. रायगड येथे असलेल्या स्थावर शेतजमिनीबाबत श्री. महेश चांडक हा इसम विकण्याचे प्रयत्न करीत असलेल्याचे आमचे अशिलांचे निर्दशनास आले आहे.

सबब सदरहु जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते कि, सदर श्री. महेश चांडक यांचे सोबत वर नमुद केलेल्या गांवातील मिळकतीबद्दल कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये.

सबब सदरहु जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते कि या मिळकतीबाबत मा. जिल्हाधिकारी रायगड यांच्यासमोर प्रकरण चालू असल्याने या मिळकतीबद्दल कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये.

जर कोणी सदर श्री. महेश चांडक यांचे वर नमुद केलेल्या गांवातील मिळकतीबद्दल काही व्यवहार केला असेल ते त्यांस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत नाहीत याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**श्री. विशाल वि. जाजु**
**वकील, उच्च न्यायालय, मुंबई**
**४०१, ए विंग, ग्रेट इस्टर्न समीट, सेक्टर-१५.**
**सी.बी.डी. बेलापूर. नवी मुंबई ४००६१४**


# कुणबी समाजोन्नती संघाच्या सचिवपदी उमेश अडखळे, तर गजानन निंबरे सहसचिव

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कुणबी समाजोन्नती संघ श्रीवर्धन तालुका (स्थानिक) व मुंबई कमिटीची संयुक्त सभा ३१ मे रोजी कुणबी समाज मंदिर येथील ग. स. कातकर सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. तालुका अध्यक्ष सीताराम साळवी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत संघटनेच्या सचिवपदी उमेश अडखळे आणि सहसचिवपदी गजानन निंबरे यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली.

या निवडीमुळे श्रीवर्धन तालुक्यातील कुणबी समाजाला तरुण, सुशिक्षित, अभ्यासू आणि समाजकार्याची तळमळ असलेले नेतृत्व लाभल्याची भावना उपस्थित सदस्यांनी व्यक्त केली. सभागृहात टाळ्यांच्या कडकडाटात नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. उमेश अडखळे हे यापूर्वी तालुका कमिटीचे सहसचिव तसेच गालसुरे विभाग २० कमिटीचे सचिव म्हणून यशस्वीपणे कार्यरत होते. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि संघटनात्मक उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय भूमिका बजावत समाजहितासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे, तर गजानन निंबरे यांनी बागमांडले विभागाचे सचिव म्हणून जबाबदारी पार पाडताना युवकांना संघटित करण्याबरोबरच समाजोपयोगी उपक्रमांमध्ये प्रभावी सहभाग नोंदविला आहे. नव्या नेतृत्वाकडून समाज संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# अत्याधुनिक कलोते महसूल कार्यालयाचे लोकार्पण; नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये कामकाज सुरू

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील कलोते येथील नवीन अत्याधुनिक महसूल कार्यालयाचे लोकार्पण तहसीलदार अभय चव्हाण व गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड उपस्थित होते.



विणेगाव, कलोते मोकाशी, कलोते रयती, निगडोली, नडोदे या पाच गावांचे हे कार्यालय आहे. महसूल अधिकारी माधव कावरखे यांनी अत्याधुनिक महसूल कार्यालय लोकसहभागातून उभारले. या कार्यालयाची अंतर्गत बांधणी व अंतर्गत ठेव ही आधुनिक असून काम करण्याचे समाधान मिळणार असून येणारे शेतकरी, लाभार्थी यांनाही समाधान देणारे आहे. या कार्यालयात येणाऱ्या नागरिकाचे व सामान्य माणसाचे काम प्राधान्य क्रमाने झाले पाहिजे, या कार्यालयाच्या बाबतीत तक्रार येता कामा नये, असे प्रामाणिक काम व्हावे अशी अपेक्षा तहसीलदार अभय चव्हाण यांनी व्यक्त केली. गटविकास अधिकारी संदीप कराड यांनीही या प्रशासकीय इमारतीचे कौतुक केले असून सामान्य जनतेला न्याय देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले, तर निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी हे नव्याने उभारलेल्या कार्यालयाबाबत महसूल अधिकारी माधव कावरखे यांचे विशेष कौतुक केले. लोकसहभागातून उभे राहिलेले कार्यालय हे खालापूर तालुक्यातील एक नमुना आहे. याचे अनुकरण जिल्ह्यात होणे अपेक्षित आहे.

मंडळ अधिकारी माणिक सानप, ॲड. राजेंद्र मोरे, आप्पा शिंदे, अक्षय म्हामुनकर, निलेश बेलोसे यांच्यासह लोकसहभाग मदत करणारे, स्थानिक शेतकरी, ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.

# रानभाज्यांची खवय्यांना पर्वणी

**माणगाव : प्रतिनिधी**

पावसाळा म्हणजे रानभाज्यांची पर्वणी असते. काही भाज्या पावसाळ्यापूर्वी उगवतात तर काही भाज्या ह्या पावसाळ्यात उगवतात. शेवळं, कुडा, आकुड,टाकला इत्यादी रानभाज्या पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यात उगवतात. या रानभाज्या खायला चवदार व पौष्टिक असे औषधी व गुणकारी असतात. त्यामुळे या रानभाज्यांना पावसाळ्यात खवय्यांची मोठी मागणी असते. या रानभाज्यांची खवय्ये आतुरतेने वाट पाहत असतात. या भाज्या बाजारपेठेत दाखल झाल्यावर खवय्ये आवर्जून या भाज्या विकत घेत असतात.



गेल्या काही दिवसांपासून रानातील रान भाज्यांना बहर आला आहे .जिल्ह्यातील बाजारपेठेत रान भाज्या मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी येत असून रानभाज्याना मोठी मागणी आहे. पावसाळ्यापूर्वी व पावसाळयात रानात कुडा,शेवल,आकुड,टाकला इत्यादी रानभाज्या मोठ्या प्रमाणात उगवतात.या रानभाज्या खायला चविष्ट व पौष्टीक असतात. पावसापूर्वी ऋतूत येणाऱ्या या भाज्या खवय्यांच्या पसंतीच्या असून या ऋतूत या भाज्यांना चांगली मागणी आहे. रानभाज्या उगवल्या असून पावसाळा वाढत जाईल तशा अनेक भाज्या तयार होणार आहेत. आदिवासी स्त्रिया रानावणात फिरून सदर भाज्या मिळवतात. दरम्यान, या सर्व भाज्या विकून त्यांना रोजगार मिळत असून आर्थिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध होत आहे. साधारण २० ते १०० रुपयांपर्यंत या भाज्या विकल्या जातात. आवक वाढेल तशी १० रुपये प्रतिजुडी मिळेल.




# सौरऊर्जेच्या वापरात नवी मुंबई अव्वल

## महाराष्ट्र ऊर्जा एक्स्पो २०२६मध्ये उत्कृष्टता पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

विविध सेवासुविधा क्षेत्रातील उल्लेखनीय कामाबद्दल राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पारितोषिके, पुरस्कारांनी नवी मुंबई महानगरपालिकेचा वेळोवेळी गौरव झालेला असून नुकताच ऊर्जा क्षेत्रातील विशेष पुरस्कार प्राप्त झाला आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने ऊर्जा क्षेत्रात शाश्वत शहरी विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'सोलर क्वार्टर' या मान्यताप्राप्त संस्थेच्या वतीने आयोजित 'महाराष्ट्र ऊर्जा एक्स्पो पुरस्कार २०२६' मध्ये नवी मुंबई महानगरपालिकेस 'नवीकरणीय ऊर्जाधारित शहरी प्रशासनातील उत्कृष्टता' या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



नागपूर येथे संपन्न झालेल्या विशेष समारंभात महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाचे प्रादेशिक संचालक सारंग महाजन यांच्या हस्ते नवी मुंबई महानगरपालिका विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रवीण गाडे यांनी हा पुरस्कार उपअभियंता संतोष मोरास्कर यांच्या उपस्थितीत स्वीकारला. या पुरस्काराबद्दल महापौर सुजाता पाटील आणि आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी शहर अभियंता शिरीष आरदवाड आणि विद्युत विभागाचे अभिनंदन केले आहे. या पुरस्कारामुळे राज्यातील नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात नवी मुंबई महानगरपालिकेच्या वैशिष्ट्यपूर्ण योगदानाचे महत्त्व अधोरेखित झाले. मागील काही वर्षांत नवी मुंबई महानगरपालिकेने मोठ्या प्रमाणावर स्वच्छ ऊर्जा प्रकल्प राबविण्यासोबतच जनजागृतीपर विविध उपक्रम राबविले आहेत.

या अंतर्गत महानगरपालिकेने २५ सार्वजनिक इमारती व ५० सार्वजनिक सुविधांवर सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वीपणे स्थापित केले असून, आणखी काही प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या प्रक्रियेत आहेत. या प्रकल्पांमुळे दरवर्षी ३.५ लाख युनिट्सपेक्षा अधिक नवीकरणीय ऊर्जानिर्मिती होत असून, साधारणतः १.२ मेगावॅट स्थापित क्षमतेसह ४,५०० MWh पेक्षा अधिक ऊर्जाबचत साध्य करण्यात आलेली आहे. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत ५१ हजारांहून अधिक सौर व एलईडी आधारित रस्त्यांवरील दिवे बसवून ऊर्जा कार्यक्षमतेत मोठा बदल घडवून आणण्यात आलेला आहे. यामुळे ऊर्जा वापर, देखभाल व दुरुस्ती खर्च आणि कार्बन उत्सर्जनात लक्षणीय घट झाली असून नागरिकांच्या सुरक्षेतही वाढ झाली आहे.

या उपक्रमांमध्ये नागरिक सहभागावर विशेष भर देण्यात आला असून प्रशिक्षण कार्यशाळा, परिसंवाद आणि पथनाट्य यांसारख्या उपक्रमांद्वारे नागरिक व भागधारकांना नवीकरणीय ऊर्जा, ऊर्जा बचत आणि शाश्वत जीवनशैलीबाबत जागरूक करण्यात आले आहे. यापुढील काळात नवीकरणीय ऊर्जा उपक्रमांमध्ये मोरबे धरणावरील १०० मेगावॅट फ्लोटिंग सोलर प्रकल्प विशेष वैशिष्ट्यपूर्ण असणार आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारीत विकसित होणारा हा प्रकल्प पहिल्या टप्प्यात दरवर्षी १३५ दशलक्ष युनिट्स स्वच्छ ऊर्जानिर्मिती करणार असून यामुळे वीज खर्चात बचत आणि कार्बन उत्सर्जनात घट होईल तसेच देशाच्या स्वच्छ ऊर्जा उद्दिष्टांनाही हातभार लागेल.

नवी मुंबई महानगरपालिकेस लाभलेला हा सन्मान महानगरपालिकेच्या ऊर्जा कार्यक्षमता, पर्यावरणविषयक जागरूकता आणि दूरगामी शाश्वत सुविधा उभारण्याच्या कार्यवाहीला मिळालेली प्रोत्साहनात्मक दाद असून या पुरस्कारामुळे नवी मुंबई महानगरपालिकेने नवीकरणीय ऊर्जा आणि शाश्वत शहरी प्रशासनात आघाडीवर असल्याचे पुन्हा अधोरेखित केले आहे. भविष्यात ऊर्जा स्वयंपूर्णता आणि पर्यावरणीय शाश्वतता साध्य करण्यासाठी अधिक वेगाने प्रयत्न सुरू ठेवले जाणार आहेत.

# 'सारथी'च्या संशोधक विद्यार्थ्यांकडून गडकिल्ल्यांवर स्वच्छता मोहीम

## राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा जागर

**नवी मुंबई : बातमीदार**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२व्या जयंतीचे औचित्य साधून 'शाहू विचारांचा जागर' या उपक्रमांतर्गत ऐतिहासिक गडकिल्ल्यांवर एक विशेष स्वच्छता मोहीम यशस्वीरीत्या राबविण्यात आली. महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणेच्या मुंबई विभागीय कार्यालयामार्फत या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

६ ते ९ जून या कालावधीत मुंबई विभागांतर्गत 'सारथी' संस्थेच्या अधिछात्रवृत्तीचा लाभ घेणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांनी या मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. ऐतिहासिक वारशाचे जतन, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव याद्वारे समाजात जनजागृती निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या मोहिमेदरम्यान रायगड, पालघर आणि मुंबई जिल्ह्यातील एकूण चार प्रमुख ऐतिहासिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. रायगड जिल्ह्यात कर्नाळा आणि रायगड किल्ला परिसरात स्नेहल पुंडे, विजय कुले, रंजीत मस्के व मयूर पारधी या विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. त्यांनी संपूर्ण परिसरातून प्लास्टिक, कागद आणि इतर टाकाऊ वस्तू गोळा करून एकूण नऊ गोण्या कचरा संकलित केला.

पालघर जिल्ह्यातील ऐतिहासिक वसई किल्ला परिसराची स्वच्छता प्रतीक्षा जाधव, वैभव बिराजदार, तुषार मांडवकर, सुवर्णा साठे व प्रतीक भोसले या विद्यार्थ्यांनी केली आणि तेथून चार गोण्या कचरा बाहेर काढला, तर मुंबई जिल्ह्यातील सायन फोर्ट परिसरात दत्तात्रय काळे, स्नेहा पाटील व कोमल वांडूस्कर या विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबवून चार गोण्या कचरा गोळा केला. सारथीच्या या संशोधक विद्यार्थ्यांनी तिन्ही जिल्ह्यांतील ऐतिहासिक स्थळांवरून एकूण १७ गोण्या कचरा गोळा केला आणि या संकलित केलेल्या सर्व कचऱ्याची सुरक्षित व योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली.

'सारथी'चे उपव्यवस्थापकीय संचालक तथा उपजिल्हाधिकारी अश्विनीकुमार पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विभागीय कार्यालयाने हा स्तुत्य उपक्रम यशस्वी केला. आगामी २६ जून रोजी होणाऱ्या छत्रपती शाहू महाराज जयंतीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी कृतीतून दिलेला हा 'शाहू विचारांचा संदेश' अतिशय दिशादर्शक ठरला आहे.

# डॉ. सुमंगल फडणीस यांची दोन पुस्तके प्रकाशित



**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोचे माजी मुख्य आरोग्य अधिकारी व नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनच्या सचिवपदाची गेली ३० वर्षे यशस्वीपणे धुरा सांभाळणारे डॉ. सुमंगल फडणीस यांनी स्वानुभवावर लिहिलेल्या व स्वतः प्रकाशित केलेल्या दोन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ नुकताच नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशनच्या सभागृहात पार पडला. ठाणे येथील सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ व स्पाईन सर्जन डॉ. विनोद इंगळहळीकर यांनी प्रकाशन समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविले.

यावेळी सिडकोचे माजी पणन व्यवस्थापक अरुण सबनीस व मराठी साहित्य संस्कृती व कला मंडळ, वाशीचे अध्यक्ष सुभाष कुळकर्णी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. सुमंगल फडणीस यांनी लिहिलेल्या दोन पुस्तकांपैकी मराठी भाषेतील 'दोन माणसे' हे पुस्तक म्हणजे वैद्यकीय व्यवसायाशी संबंधित कथांचा संग्रह आहे, तर दुसरे पुस्तक 'Be Fit, Healthy and Happy' हे इंग्रजीत असून फिटनेस व चांगले आरोग्य कसे राखावे या विषयासंबंधी आहे. साहित्य, संगीत आणि कलाप्रेमी असलेल्या डॉ. विनोद इंगळहळीकर यांनी आपल्या भाषणाने सर्वांनाच प्रभावित केले. तसेच दोन्ही पुस्तके डॉ. सुमंगल फडणीस यांनी चांगली व अभ्यासपूर्ण लिहिलेली असून प्रत्येकाने ती आपल्या संग्रही ठेवावीत, असे आवाहन केले. प्रकाशन समारंभास नवी मुंबईतील अनेक साहित्यप्रेमी उपस्थित होते.

# नवी मुंबईत विशेष प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनापासून पर्यावरणविषयक जाणीवजागृती करणारे उपक्रम राबविण्यासोबतच वृक्षारोपण, सखोल स्वच्छता मोहिमा, घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने माहिती प्रचार अशा विविध मोहिमा राबविल्या जात आहेत. त्या अनुषंगाने शुक्रवारी (दि. १२) आठही विभाग कार्यालय क्षेत्रात विशेष प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्यात आली.

५ ते १२ जून या कालावधीत असे कार्यक्रम सातत्यपूर्ण राबवण्यात आले. अशाच प्रकारचा पर्यावरणाला हानिकारक



असणाऱ्या प्लास्टिकविषयी जनजागृती करण्याच्या उपक्रमासोबतच एकल वापर प्लास्टिकला प्रतिबंध करण्यासाठी तपासणी मोहिमांचेही सर्वत्र आयोजन करण्यात आले आहे. या विशेष मोहिमेमध्ये प्लास्टिक पिशव्या आणि एकल वापर प्लास्टिकचा उपयोग करताना आढळलेल्या ३० व्यावसायिक आणि आस्थापना यांच्यावर कारवाई करीत त्यांच्याकडून एक लाख ५५ हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली तसेच साधारणतः १५८ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला.

### १५८ किलो प्लास्टिक जप्त, एक लाख ५५ हजारांचा दंड वसूल

यामध्ये बेलापूर विभागातून ३० हजार दंडात्मक रक्कम आणि १० किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले तसेच नेरूळ विभागातून १० हजार दंडात्मक रक्कम व पाच किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिकची जप्ती करण्यात आली. वाशी विभागातून पाच हजार दंडात्मक रक्कम व पाच किलो प्लास्टिक साठा आणि तुर्भे विभागात आठ व्यावसायिक, आस्थापना यांच्याकडून ४५ हजार दंडात्मक रक्कम तसेच तब्बल १०० किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले. अशाच प्रकारे कोपरखैरणे विभागातून २० हजार दंडात्मक वसुली आणि दोन किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त तसेच घणसोली विभागातून ३० हजार दंडात्मक वसुली आणि २८ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले.

ऐरोली विभागातूनही १५ हजार दंडात्मक रक्कम वसुली आणि आठ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. प्लास्टिकचा वापर टाळणे महत्त्वाचे असून नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर सुरू करावा व प्रतिबंधात्मक एकल वापर प्लास्टिकला आपल्या जीवनातून हद्दपार करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# नवी मुंबईत बाहेरून आणले डेब्रिज

## उपमहापौर दशरथ भगत यांनी घेतली गंभीर दखल

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईबाहेरून आलेल्या गाळामुळे बाधित झालेल्या १०हून अधिक कारखान्यांची पाहणी उपमहापौर दशरथ भगत यांनी महापालिका अधिकाऱ्यांसमवेत केली. घटनास्थळावरील ओल्या गाळाचा राडारोडा सर्वप्रथम महापालिकेने उचलावा. पावसाळा तोंडावर असल्याने मागील टेकडीवरून वाहून येणारा मातीमिश्रित गाळ व पाण्याचा निचरा थोपविण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना त्वरित महापालिका किंवा एमआयडीसीने करावी, अशी मागणी त्यांनी केली.



या घटनेमुळे बाधित झालेल्या लघुउद्योजकांच्या नुकसानीचे शासनाने पंचनामे करून भरपाई द्यावी, अशी मागणी उपमहापौर भगत यांनी केली आहे. बाधित लघुउद्योग कारखान्यांमधील कामगारांचा उद्ध्वस्त झालेल्या रोजगारापोटी शासनाने मदत करून न्याय द्यावा. आगामी महापालिकेच्या महासभेत या घटनेसह पुन्हा अशा घटना घडू नयेत याबाबतीत प्रतिबंधात्मक कारवाया तीव्र करण्याबाबत उपमहापौरांनी लक्षवेधी सूचना घेण्यासाठी महापौर सुजाता पाटील यांना त्वरित पत्र दिले आहे. पावणे एमआयडीसीमधील सी ब्लॉकमागील टेकडीवरून नवी मुंबई शहराबाहेरून आलेल्या गाळाचे अनधिकृत डम्पिंग सुरू असलेला राडारोडा मोठ्या प्रमाणात वाहत आल्याने तेथील लघुउद्योग असलेल्या अनेक कारखान्यांच्या वास्तूत घुसल्याची घटना मंगळवारी घडली होती.

या घटनेत नशिबाने कारखान्यांतील कामगारांची प्राणहानी झाली नाही, मात्र येथील लहान कारखानादारांचे प्रचंड मोठे नुकसान झालेले आहे. परिणामी उद्योगधंदा उध्वस्त झाल्याने लघुउद्योजक व प्रामुख्याने कामगारांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. घटनास्थळाची उपमहापौर दशरथ भगत यांनी महापालिकेच्या विभागीय सहायक आयुक्त भरत धांडे, सागर मोरे व कनिष्ठ अभियंता अमित पवार यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी उपमहापौरांनी घटनेत नुकसानग्रस्त झालेल्या कारखान्यांना व बाधित झालेल्या लघुउद्योजक आणि कामगार यांच्यासोबत संवाद साधला. संवादादरम्यान लघुउद्योजकांना धीर देत शासनाच्या माध्यमातून नुकसानभरपाई मिळणेकामी उचित मार्गदर्शन केले तसेच घटनास्थळाहून महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना संपर्क करून तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली या घटनेतील बाधितांना सर्वतोपरी सहकार्य व नुकसानभरपाईसाठी पाठपुरावा करणार असल्याचे उपमहापौर दशरथ भगत यांनी सांगितले.

# १५ जूनला नमुंमपा शाळांमध्ये प्रवेशोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या ८० प्राथमिक व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक आणि केंद्र प्रमुख यांची सहविचार कार्यशाळा महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न झाली. यामध्ये शाळा प्रवेशोत्सवाचे नियोजन तसेच शिक्षण रूपांतरण धोरण, समग्र शिक्षण अभियान आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी व सर्वांगीण विकासाकरिता राबवायचे उपक्रम याविषयी माहिती देण्यात आली.

अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी १५ जून रोजी प्रत्येक शाळेत शाळा प्रवेशोत्सव समारंभ आयोजित करून विद्यार्थ्यांचे उत्साही स्वागत करावे आणि त्यांच्या हातात पाठ्यपुस्तके व गणवेश मिळतील अशा प्रकारे नियोजन करावे, असे निर्देश दिले. या शाळा प्रवेशोत्सव समारंभाप्रसंगी प्रत्येक शाळेत महानगरपालिकेचा एक अधिकारी उपस्थित राहणार असून सर्व शाळांमध्ये याबाबतची कार्यवाही प्रभावीपणे करावी, असे सूचित केले.

### पाठ्यपुस्तके, गणवेश वाटपाचे निर्देश; अधिकारी राहणार स्वागताला उपस्थित

हे अधिकारी पुढील शैक्षणिक वर्षात त्या शाळेच्या भौतिक गरजा व शैक्षणिक उपक्रमाच्या कामगिरीत मार्गदर्शन करतील व गुणात्मक दर्जा उंचावतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शालेय गुणवत्ता वाढीसाठी मुख्याध्यापकांनी आपल्या शिक्षकांसह प्रभावी नियोजन करावे व कालबद्ध अंमलबजावणी करावी, अशाही सूचना त्यांनी केल्या. शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे यांनी महानगरपालिकेने संमत केलेल्या शिक्षण रूपांतरण धोरणाचे माहितीपूर्ण सादरीकरण केले. मुख्याध्यापकांनी शाळा स्तरावर हे धोरण यशस्वीपणे राबविण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीचे सविस्तर मार्गदर्शन करण्यासोबतच त्यांनी मागील वर्षातील समग्र शिक्षा अभियानाचा आढावा घेतला. आपले कामकाज डिजिटलायझेशनकडे गतीमान वाटचाल करत असून त्या अनुषंगाने ऑनलाइन कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याकडे लक्ष द्यावे व त्यासाठी कार्यशाळा लावावी, अशाही सूचना त्यांनी केल्या.

शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी शाळा स्तरावरील विविध समित्या, त्यांची रचना व कार्यपद्धती, विद्यार्थी सुरक्षा, प्रवेश प्रक्रिया तसेच गुणवत्ता शिष्यवृत्ती परीक्षण याविषयीची सविस्तर माहिती दिली. इयत्ता नर्सरीचे इंग्रजी माध्यमातील वर्ग ५१ प्राथमिक शाळांमध्ये सुरू करण्याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच शालेय पोषण आहार विषयीचा आढावा घेण्यात आला. समन्वयक आत्माराम आंग्रे यांनी अपार, आधार याविषयीच्या समस्यांचे निराकरण करीत सध्या सर्व शाळांमध्ये सुरू असलेल्या ऑनलाइन उपक्रम प्रमोशन याबाबत सविस्तर माहिती दिली. निपुण महाराष्ट्र, पीजीआय अहवाल, यु-डायस प्लस अशा शालेय कामकाजाचा आढावा घेण्यासोबतच राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा अभियान तसेच देशभक्तीपर गीतांवर कवायत याबाबत शाळांनी आतापासून तयारी ठेवावी, असेही मार्गदर्शन त्यांनी केले.

यावेळी मुख्याध्यापकांनी शाळांचे विविध प्रश्न मांडले. सुलभा बारघरे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यशाळेमधून नव्या शैक्षणिक वर्षातील उद्दिष्टे व त्याच्या अंमलबजावणीसाठी दिशा मिळाल्याचे अभिप्राय सहभागी मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांनी व्यक्त केले.

# मान्सून हंगामासाठी कोकण रेल्वे सज्ज

## प्रवासी सुरक्षेसाठी व्यापक उपाययोजना

**नवी मुंबई : बातमीदार**

मान्सूनमुळे कोकण प्रदेश निसर्गसौंदर्याने नटून जातो, परंतु त्याचबरोबर मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीमुळे रेल्वे संचालनासमोर मोठी आव्हानेही उभी राहतात. प्रवाशांची सुरक्षा आणि अखंड रेल्वे सेवा या सर्वोच्च प्राधान्यांना लक्षात घेऊन कोकण रेल्वेने आपल्या संपूर्ण मार्गावर व्यापक मान्सूनपूर्व तयारी केली आहे. सक्रिय आणि दूरदृष्टीपूर्ण दृष्टिकोनाचा भाग म्हणून कोकण रेल्वेने पायाभूत सुविधांचे बळकटीकरण, भूसुरक्षा उपाययोजना, रिअल-टाइम निरीक्षण प्रणाली, वाढीव गस्त आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा यांचा समावेश असलेली सर्वसमावेशक मान्सून तयारी योजना राबविली आहे.

भूसुरक्षा आणि निरीक्षण तंत्रज्ञानातील सातत्यपूर्ण प्रगतीमुळे कोकण रेल्वे मान्सून हंगामातील आव्हानांना तोंड देण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे. १५ जून ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत मान्सून



वेळापत्रक लागू राहील. सुरक्षित आणि विश्वासार्ह रेल्वे वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी मार्गावरील विविध विभागांमध्ये वेगमर्यादा लागू करण्यात येतील. पायाभूत सुविधा आणि जलनिस्सारण व्यवस्था उतारांची स्थिरता वाढविण्यासाठी निवडक ठिकाणी कटिंग स्लोप्स सपाट करणे आणि सॉइल नेलिंगची कामे करण्यात आली आहेत. बोगदे आणि कटिंग भागांमध्ये रॉक बोल्टिंग व शॉटक्रीटिंगची कामे करून भूगर्भीय संरचना मजबूत करण्यात आल्या असून दरडी कोसळण्याला प्रतिबंध करण्यात आला आहे. गॅबियन भिंती, रिटेनिंग वॉल्स, मायक्रोपाइल्स आणि बोल्डर नेटिंग यांसारख्या संरक्षणात्मक संरचना उभारून भूतांत्रिक जोखमींवर नियंत्रण ठेवण्यात आले आहे.

साइड ड्रेन्स आणि कॅचवॉटर ड्रेन्सची साफसफाई व काँक्रीट लाइनिंग पूर्ण करण्यात आली असून पावसाळ्यात पाण्याचा निचरा सुरळीत होईल याची काळजी घेण्यात आली आहे. सुरू असलेल्या आणि पूर्ण झालेल्या भूसुरक्षा कामांमुळे संपूर्ण मार्गावरील दगड कोसळणे आणि माती घसरण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय घट झाली आहे. संवेदनशील ठिकाणी पोर्टेबल डीवॉटरिंग पंप तैनात करण्यात आले आहेत. या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मागील दशकात मान्सून काळात दगड कोसळल्यामुळे कोकण रेल्वेच्या सेवेत कोणताही मोठा व्यत्यय आलेला नाही. संवेदनशील ठिकाणी ६५७ प्रशिक्षित कर्मचारी २४ तास गस्तीसाठी तैनात केले जाणार आहेत. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसादासाठी चिपळूण, रत्नागिरी, कणकवली आणि वेरणा येथे BRN वॅगनवर बसविलेले उत्खनन यंत्र सज्ज ठेवण्यात आले आहेत.

रेल्वे मेंटेनन्स वाहने वीर, चिपळूण, रत्नागिरी, राजापूर रोड, कुडाळ, वेरणा, कारवार, भटकळ आणि उडुपी या महत्त्वाच्या ठिकाणी तैनात आहेत. माणगाव, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, करमळी, कारवार आणि उडुपी येथे टॉवर वॅगन्स तत्पर ठेवण्यात आल्या आहेत. कमी दृश्यमानतेच्या परिस्थितीत लोको पायलटांना रेल्वेचा वेग ४० किमी प्रतितास मर्यादित ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रेल्वे रुळांच्या पातळीपेक्षा १०० मिमीपेक्षा अधिक पाणी साचल्यास गाडी थांबविण्यात येईल. पाणी ओसरल्यानंतरच रेल्वेसेवा पुन्हा सुरू केली जाईल. माणगाव, दिवाणखवटी, चिपळूण, संगमेश्वर रोड, वैभववाडी रोड, कुडाळ, मडगाव जंक्शन, काणकोण, कारवार, भटकल आणि उडुपी येथे पूर्ण वैद्यकीय साहित्य व उपकरणांसह अपघात निवारण वैद्यकीय उपकरणे उपलब्ध आहेत. ऑपरेशन थिएटर आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधांनी सुसज्ज स्वयंचलित अपघात निवारण वैद्यकीय वाहने रत्नागिरी आणि वेरणा येथे तैनात आहेत.

प्रवासी www.konkanrailway.com या संकेतस्थळावर किंवा १३९ या हेल्पलाइन क्रमांकावर रेल्वेची अद्ययावत माहिती मिळवू शकतात. कोकण रेल्वे सुरक्षितता, विश्वासार्ह सेवा आणि प्रवासी सुविधा यांसाठी कटिबद्ध आहे. व्यापक तयारी आणि सतत देखरेखीच्या माध्यमातून कोकण रेल्वे संपूर्ण मान्सून हंगामात सुरक्षित आणि सुरळीत रेल्वे सेवा सुनिश्चित करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे.

# शिरवणेत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



शिरवणे येथील श्री गणेश मंदिर चॅरिटेबल ट्रस्टच्या विद्यमाने शिरवणे येथील श्री स्वयंभू गणेश मंदिराचा १६वा वर्धापन दिन आणि पालखी सोहळा शनिवार आणि रविवार असे दोन दिवस विविध धार्मिक, विधिवत पूजापाठ करून साजरा केला जाणार असल्याचे भाजप नेते, माजी महापौर व ट्रस्टचे सचिव जयवंत सुतार यांनी सांगितले.

रविवारी सकाळी विविध धार्मिक पूजा आणि महाआरती, दुपारी श्री कुलदेवता प्रासादिक भजन मंडळ (पुसावे) हभप बेलीप बुवा पाटील यांचे सुश्राव्य भजन, दुपारी ठाणे-बेलापूर पंचक्रोशीतून स्वयंभू गणेश दर्शनासाठी आलेल्या भक्तांसाठी महाप्रसाद ठेवण्यात आला आहे. त्यानंतर सायंकाळी हनुमान प्रासादिक भजन मंडळ, शिरवणे बुवा नंदकुमार सुतार व देवेंद्र पवार यांचे भजन होणार आहे, तर सायंकाळी श्री गणेश पालखी मिरवणूक सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याचे ट्रस्टचे अध्यक्ष नामदेव ठाकूर, सचिव जयवंत सुतार यांनी सांगितले आहे.

# शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या तयारीला वेग

## सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे –मंत्री भरत गोगावले

**अलिबाग : प्रतिनिधी**

दुर्गराज रायगडावर तिथीनुसार २७ जून रोजी होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या तयारीला वेग आला असून, सोहळ्याचे नियोजन सुयोग्य, सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वय ठेवून काम करावे, असे निर्देश रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांनी दिले.



महाड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित आढावा बैठकीत शिवराज्याभिषेक सोहळयाच्या विविध तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी पंचायत समिती महाडच्या सभापती प्रेरणा सावंत, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवतारे, उपजिल्हाधिकारी डॉ. रविंद्र शेळके, विविध विभागांचे अधिकारी तसेच कोकणकडा मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री गोगावले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेकाचा ऐतिहासिक सोहळा हा महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेचे प्रतीक आहे. दरवर्षी हजारो शिवभक्त या सोहळ्यासाठी रायगडावर येत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेसह सर्व मूलभूत सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. प्रत्येक विभागाने आपल्या कार्यक्षेत्रातील कामे वेळेत पूर्ण करून सोहळा यशस्वी करण्यासाठी योगदान द्यावे.

सोहळयादरम्यान पावसाची शक्यता लक्षात घेऊन मंडप, भोजन, विद्युत पुरवठा, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि आरोग्य सुविधा सक्षम ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका, स्ट्रेचर आणि आवश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवण्यावर भर दिला. सर्पदंशासारख्या संभाव्य घटनांच्या अनुषंगाने आवश्यक उपचार साहित्य आणि औषधे उपलब्ध ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले की, शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या अनुषंगाने प्रशासनाने विविध समित्यांची स्थापना केली असून आरोग्य, पाणीपुरवठा, परिवहन, विद्युत, खानपान, मंडप, स्वचछता, शौचालय व्यवस्था, राजशिष्टाचार आणि सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन सुरू आहे. शिवभक्तांना कोणतीही गैरसोय होणार नाही यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असून समितीनिहाय कामांचा नियमित आढावा घेतला जात आहे.

बैठकीत विविध समित्यांनी आतापर्यंत झालेल्या तयारीचा आढावा सादर केला. तसेच कोकणकडा मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनीही सोहळयाच्या नियोजनासंदर्भात विविध सूचना मांडल्या.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पादत्राणे व्यावसायिकांना गटई स्टॉलचे वाटप

**अलिबाग : प्रतिनिधी**

अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील पादत्राणे दुरुस्ती व्यवसायिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांना सुरक्षित व सन्मानपूर्वक व्यवसाय करता यावा या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या गटई स्टॉल योजनेअंतर्गत जिल्ह्यातील १० पात्र लाभार्थ्यांना गटई स्टॉलचे वितरण करण्यात आले.

मुलांचे शासकीय वसतिगृह, वरसोली (अलिबाग) येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना गटई स्टॉलचे वाटप करण्यात आले. यावेळी शासनाच्या १०० टक्के अनुदान योजनेअंतर्गत स्टॉल उपलब्ध करून देण्याबरोबरच प्रत्येक लाभार्थ्याच्या बँक खात्यात रु. ५ हजारांची आर्थिक मदत जमा करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी गटई स्टॉलधारकांचे अभिनंदन केले. तसेच व्यवसाय अधिक सक्षम व आधुनिक करण्यासाठी कौशल्य विकास विभागामार्फत उपलब्ध प्रशिक्षणांचा लाभ घ्यावा, तसेच व्यवसाय विस्तारासाठी विश्वकर्मा कर्जयोजना आणि जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण) सुनिल जाधव तसेच कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.



## वाढदिवसानिमित्त १०० देशी झाडांची लागवड

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील ॲड. कैलास मोरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त झकपक कार्यक्रम करण्यापेक्षा पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी १०० देशी झाडे लावण्याचा निर्धार केला आणि तो प्रत्यक्षात उतरविला.

कर्जतच्या प्रसिद्ध अशा कचेरी टेकडीवर वृक्षारोपण कार्यक्रमास उपगराध्यक्ष संतोष पाटील, माजी उपगराध्यक्ष अशोक ओसवाल, नगरसेवक महेंद्र चंदन, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील, नगर परिषदेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, माजी नगरसेवक प्रवीण गांगल आदींच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण समारंभाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी चिंच, वड, कडुलिंब, करंज आदी देशी झाडांचे रोपण करण्यात आले. सूत्रसंचालन सुनील गायकवाड यांनी केले.



## मुरूड एसटी डेपोतील समस्यांवर नियंत्रकांसोबत चर्चा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तहसीलदार कार्यालयात तहसीलदार आदेश डफळ यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य परिवहन मंडळाचे रायगड विभागीय नियंत्रक डॉ.सुहास चौरे यांच्या उपस्थितीत येथील जनतेचे सेवक यांनी येथील एसटी डेपोच्या अनेक समस्यांबाबत तक्रारीचा वाचला पाढा. चर्चेतून विभागीय नियंत्रक डॉ. सुहास चौरे यांनी समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला.



यावेळी ॲड.रुपेश पाटील, कुणाल सतविडकर, नगराध्यक्ष आराधना दांडेकर, नगरसेवक नितीन आंबुर्ले, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, मनिष माळी,अजित गुरव, श्रीकांत सुर्वे, नगरसेवक रुपेश रणदिवे, उमेश भोईर, अरविंद गायकर,ललीत जैन, भावेश शहा, नगरसेवक आदेश दांडेकर, स्वप्निल कवळे, जाहिद फकजी, अनंत जोशी, अजित कासार, महेश मानकर, कुणाल जैन, राहुल कासार, सचिन शहा, किरण नाईक, निखिल दांडेकर, तारु जैन आदी उपस्थित होते.

ॲड. नगरसेवक रुपेश पाटील, कुणाल सतविडकर, श्रीकांत सुर्वे, अरविंद गायकर, ललित जैन, मनिष माळी, अजित गुरव, यांनी विभागीय नियंत्रक डॉ.सुहास चौरे यांना सांगितले की डेपो मॅनेजरांना तत्काळ कार्यमुक्त करावे व त्या जागी सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. डेपोत चांगले मेकॅनिकल ची नेमणूक करावी, जेणेकरून रस्त्यावर गाड्या बंद पडणार नाहीत. एसटी डेपोला १० नविन गाड्या दिल्या होत्या त्या गाड्या विविध डेपोत वळल्या गेल्या. त्या नवीन गाड्या पुन्हा मिळाव्यात. मुरूड –अलिबाग–पनवेल डायरेक्ट गाडी सुरू करावी. लांब पल्ल्याच्या गाड्या बंद कराव्यात. मुंबईला जाणाऱ्या अलिबाग व रोहा मार्ग या गाड्यांच्या संख्येत वाढ करावी. पावसाळ्याच्या आत काचा– खिडक्या फुटलेल्या, सीट कव्हर फाटलेल्या, छताला ओल पडलेल्या अवस्थेत असलेल्या अनेक एसटी बसेस त्वरित दुरुस्त कराव्यात. मुरूड भालगाव रोहा एसी (शिवशाही/शिवनेरी) सुरू करावी, जेणेकरुन पर्यटकांच्या संख्येत वाढ होईल. एसटी डेपो डिझेल पंप १० वर्षांपासून बंद आहे तो पहिले सुरु करावा. मुरूड येथे सीएनजी पंप व डिझेल पंप नसल्याने अलिबाग डेपोत सीएनजी भरण्यासाठी एक तासपेक्षा वेळ घेतला जातो. यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मुरूड एसटी डेपो चांगल्या फायद्यात असुन सुद्धा डेपोची दुरावस्था का? अजुनही प्रवाशांना चांगल्या सुविधा पासुन वंचित राहावे लागत आहे अशा विविध समस्या असुन या समस्या तातडीने सोडवा नाहीतर नागरिकांचा उद्रेक होईल.

यावर रायगड विभागीय नियंत्रक डॉ सुहास चौरे यांनी सांगितले की १५ जुनपर्यंत नवीन आगार व्यवस्थापकांची नेमणूक करण्यात येईल तसेच २५ जून पर्यंत मेकॅनिकलची तरतूद करण्यात येणार आहे. डिझेल पंप व सीएनजी पंप या संदर्भात सविस्तर माहिती घेऊन दोन दिवसांत आगार व्यवस्थापककडे कळवितो. अपघात घटनासंदर्भात चालक व आगार व्यवस्थापक यांना नोटीस काढण्यात आली आहे. मुरुड डेपोच्या समस्या ऐकण्यासाठी व सोडविण्यासाठी दर महिन्याला मी एसटी डेपोत असणार आहे. व्हॉटस्ॲप ग्रुप करा व आपल्या समस्या मांडा. त्या सोडविल्या जातील.

## मध्य रेल्वेची एप्रिल ते मे महिन्यात २५.७६ कोटी प्रवाशांची वाहतूक

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने एप्रिल ते मे २०२६ या कालावधीत प्रवासी आणि मालवाहतूक अशा दोन्ही क्षेत्रांत सातत्यपूर्ण प्रगती साधली आहे. यामुळे उत्पन्न आणि मालवाहतूक (लोडिंग) कामगिरीत सुधारणा दिसून आली आहे. मध्य रेल्वेने एप्रिल ते मे २०२६ या कालावधीत २५.७६ कोटी प्रवाशांची वाहतूक केली. प्रवासी उत्पन्नातही चांगली वाढ झाली असून या काळात १,३५७.२० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. मागील वर्षीच्या याच कालावधीतील १,१७६.४७ कोटी रुपयांच्या तुलनेत ही १५.३६ टक्के वाढ आहे.

मालवाहतुकीच्या बाबतीत एप्रिल ते मे २०२६ या कालावधीतील उत्पन्न १,४४२.५४ कोटी रुपयांवर पोहचले जे मागील वर्षीच्या याच कालावधीतील १,४३३.१२ कोटी रुपयांच्या तुलनेत ०.६६% अधिक आहे. एप्रिल ते मेदरम्यान १४.१३ दशलक्ष टन मालाची वाहतूक करण्यात आली, जी मागील वर्षीच्या १३.५८ दशलक्ष टनांच्या तुलनेत ४.०५% अधिक आहे.

एप्रिल ते मे या कालावधीत पार्सल वाहतुकीतून ४५.२० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आणि एकूण ०.८९ लाख टन वजनाच्या मालाची वाहतूक करण्यात आली.

पार्सल व्हॅन्सच्या भाडेतत्त्वावरील (लीजिंग) सेवेमध्येही सकारात्मक कल दिसून आला.सध्या २२६ एसएलआर भाडेतत्त्वावर आहेत. (मागील वर्षी १६३ होत्या) ज्यामुळे २०२६–२७मध्ये १७.२२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. तर २०२५–२६च्या कालावधीत हे उत्पन्न १२.३५ कोटी रुपये होते. त्याचप्रमाणे सध्या २४ व्हीपी भाडेतत्त्वावर आहेत. (मागील वर्षी २३ होत्या) ज्यातून २०२६–२७मध्ये ९.८२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे, तर मागील वर्षी हे उत्पन्न ९.७६ कोटी रुपये होते.

मध्य रेल्वेने २०२६–२७ मध्ये वेळापत्रकानुसार चालणाऱ्या भाडेतत्त्वावरील/इंडेंट–आधारित पार्सल कार्गो एक्सप्रेस गाड्यांच्या ४५ फेऱ्या चालवल्या आहेत. यामध्ये भिवंडी रोड–सांकराईल गुड्स टर्मिनलदरम्यान धावणारी साप्ताहिक मालगाडी क्र. ००१११ (नऊ फेऱ्यांतून १.८५ कोटी रुपयांचे उत्पन्न), देवळाली–दानापूर शेतकरी समृद्धी एक्सप्रेस ही विशेष मिश्रित गाडी क्र. ०११५३ (९ फेऱ्यांतून ०.४४ कोटी रुपयांचे उत्पन्न) आणि भिवंडी रोड–सांकराईल गुड्स टर्मिनलदरम्यान धावणारी विशेष मिश्रित गाडी क्र. ०११४९ (९ फेऱ्यांतून १.७२ कोटी रुपयांचे उत्पन्न).

नागपूर विभागातील रेनिगुंटा –हजरत निजामुद्दीन एक्सप्रेस (गाडी क्र. ००७६१)ला जोडलेल्या २९ रेल्वे दुधाच्या टँकर्समधून ०.३७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले.



**मुरूड : सागरी महामार्गातील मुरूड आणि म्हसळा तालुक्यांना जोडणाऱ्या टोकेखार ते तुरुंबाडी पुलाचे काम गतीने सुरू आहे. यासाठी आगरदांडा खाडीत पिलर उभारले जात आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

## आंबिवली येथील केटी बंधाऱ्याच्या झडपांची चोरी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील मोग्रज ग्रामपंचायत हद्दीतील आंबिवली गावाच्या जवळील चिल्हार नदीवरील केटी बंधाऱ्याच्या २५ लोखंडी झडपा अज्ञात चोरट्याने चोरी करून लंपास केल्या आहेत. या लोखंडी झडपा प्रत्येकी ४० ते ५० किलो वजनाच्या आहेत. या प्रकरणी कशेळे ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे.

अंबिवली ते शिंगढोळ दोन्ही गावाच्या मध्यभागी असलेल्या चिल्हार नदीवर केटी बंधारा बांधण्यात आला असून त्याची दुरुस्ती करण्यात येत होती. या बंधाऱ्याला आमदार निधीमधून दुरुस्तीसाठी निधी मंजूर करण्यात आला होता. या बंधऱ्याचे दुरुस्तीचे काम चालू असताना बंधाऱ्याच्या लोखंडी झडपा एका बाजूला काढून ठेवल्या होत्या. त्या झडपा काही स्थानिक आज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या वेळी चोरून नेल्या.

ठेकेदार सकाळी पुन्हा काम सुरु करण्यासाठी आले असता बाजूला ठेवलेल्या लोखंडी प्लेटी दिसत नसल्याने कोणी तरी चोरी केल्याचे त्यांचा लक्षात येताच ठेकेदाराने कशेळे ग्रामीण पोलीस ठाण्यात येते चोरीची तक्रार दाखल केली आहे. याबाबत कशेळे ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी तपास करीत आहेत. केटी बांधाऱ्याच्या लोखंडी झडपा चोरीला गेल्यामुळे पावसाळा संपत आल्यावर आता पाणी कसे अडवायचे हा प्रश्न निर्माण झाला आहे. या नदीवरील बंधाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी अडते. तेच पाणी अंबिवली गावाला उन्हाळ्यात पिण्यासाठी वापरले जाते.

## मैत्री कट्टा ग्रुपकडून यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील मैत्री कट्टा ग्रुपच्या वतीने मराठा आळी परिसरातील सन २०२६च्या बॅचमधील इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन त्यांच्या शैक्षणिक यशाबद्दल गौरव करण्यात आला



या कार्यक्रमात मराठा आळीचे अध्यक्ष तथा मैत्री कट्टा ग्रुपचे अध्यक्ष प्रणव कडव यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना शिक्षणाच्या माध्यमातून समाजात आदर्श निर्माण करण्याचे आवाहन केले. यावेळी विशाल चाचले, कल्पेश चितळकर, रोशन कडव, उदय गायकर, नितेश भोसले, दीपक भगत यांच्यासह मैत्री कट्टा ग्रुपचे सर्व सहकारी उपस्थित होते.

## गायमुख शाळेला इंटरॲक्टिव्ह बोर्डसाठी अर्थसहाय्य

**माणगाव : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रायगड जिल्हा परिषद शाळा गायमुख येथे डिजिटल शिक्षणाला चालना देण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.

शाळेसाठी आवश्यक असलेल्या इंटरॲक्टिव्ह बोर्ड खरेदीसाठी आशा भट्टाचार्य (मिरा रोड, जि. ठाणे) यांनी आर्थिक सहाय्य दिले असून कृष्णा महाडिक यांच्या विशेष प्रयत्नातून नव्वद हजार रुपयांचा धनादेश गावचे अध्यक्ष कृष्णा खांडेकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या आधुनिक इंटरॲक्टिव्ह बोर्डच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दृकश्राव्य स्वरूपात शिक्षण घेता येणार असून अध्यापन अधिक प्रभावी, रंजक व तंत्रज्ञानाधारित होणार आहे.

डिजिटल साधनांच्या वापरामुळे विद्यार्थ्यांची आकलनशक्ती वाढण्यास तसेच शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी आशा भट्टाचार्य यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचे कौतुक करत त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी करण्यात आलेले हे योगदान प्रेरणादायी असून गायमुख शाळेच्या शैक्षणिक विकासाला नवी दिशा देणारे ठरणार आहे.



## सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी बंडू तुरडे

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी अनेक दशकांपासून कार्यरत असलेल्या कर्जत–तमनाथ विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी बंडू तुरडे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

परशुराम उर्फ आप्पा घारे यांनी राजीनामा दिल्याने संस्थेचे अध्यक्ष पद रिक्त झाले होते. संस्थेच्या १३ सदस्यीय संचालक मंडळातून अध्यक्षपदासाठी नामनिर्देशन प्रक्रिया सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कर्जत यांच्या कार्यालयात अध्यासी अधिकारी शिवाजी घुले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. अध्यक्षपदासाठी बंडू तुरडे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. मावळते अध्यक्ष परशुराम घारे, मधुकर घारे, शरद लाड यांच्यासह संचालक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# यजमान इंग्लंडची विजयी सलामी

## महिला वर्ल्डकपमध्ये श्रीलंकेचा उडवला धुव्वा

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

बर्मिंगहॅम येथील एजबॅस्टनच्या मैदानात विक्रमी धावसंख्या उभारल्यावर यजमान इंग्लंडच्या संघाने श्रीलंकेचा ८७ धावांनी धुव्वा उडवला. सलामीच्या लढतीतील दिमाखदार विजयात सलामीची बॅटर डॅनी वायट-हॉज हिच्या शतकी खेळीनंतर गोलंदाजीत फ्रेया केम्प हिने चार विकेट्स घेत मोलाचे योगदान दिले.



श्रीलंकेची कर्णधारी चामरी अट्टापट्टूने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, पण हा निर्णय सपशेल अपयशी ठरला. पहिल्यांदा फलंदाजी करताना इंग्लंडच्या संघाकडून एमी जोन्सच्या आणि डॅनी वायट-हॉज जोडीने पहिल्या विकेटसाठी १३५ धावांची दमदार भागीदारी रचत श्रीलंकेचा डाव हाणून पाडला. विकेट किपर बॅटर एमी जोन्स ३८ चेंडूत चार चौकार आणि ५३ धावा करून माघारी फिरली. मलकी मदारा हिने इंग्लंडची ही एकमेव विकेट घेतली. त्यानंतर कर्णधार ब्रंटने २२ चेंडूत ४६ धावांची केलेली नाबाद खेळी आणि डॅनीच्या ६२ चेंडूतील नाबाद १०५ धावांच्या जोरावर इंग्लंड महिला संघाने निर्धारित २० षटकात एक विकेट्सच्या मोबदल्यात २१९ धावा करत टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत सर्वोच्च धावसंख्या उभारली होती.

या कामगिरीसह इंग्लंड टी-२० विश्वचषक स्पर्धेत दोन वेळा २०० धावा करणारा पहिला संघ ठरला आहे. याशिवाय अन्य कोणत्याही संघाला एकदाही दोनशेचा आकडा गाठता आलेला नाही.

या विक्रमी धावसंख्येचा पाठलाग करताना श्रीलंकेच्या एकाही बॅटरचा निभाव लागला नाही. हर्षिता मादवी २९ (१८), हंसिमा करुणरत्ने ११ (८), कविशा दिलहारी १९ (१५) आणि निलाक्षी डि सिल्वा ३९ (३३) या चौघींनी दुहेरी आकडा गाठला, पण एकीलाही मोठी खेळी करता आली नाही. परिणामी श्रीलंकेचा डाव १३२ धावांत आटोला. इंग्लंडकडून फ्रेया केम्प हिने चार षटकात २२ धावा खर्च करताना सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. याशिवाय सोफी आणि चार्ली डीन यांनी प्रत्येकी दोन, तर लिन्से स्मिथ आणि लॉरेन्स बेल यांनी प्रत्येकी एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.

# महिला टी-२० वर्ल्डकपमध्ये आज भारत-पाकिस्तान लढत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषकातील विजेतेपदाचा दुष्काळ संपवल्यानंतर आता भारतीय महिला क्रिकेट संघाचे लक्ष पहिल्या टी-२० विजेतेपदावर आहे. भारतीय संघ १४ जून रोजी बर्मिंगहॅम येथील एजबॅस्टनच्या मैदानात पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याने आपल्या मोहिमेची सुरुवात करेल.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय महिला संघाने आयसीसी महिला वनडे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेत जेतेपदाचा मान पटकावला होता. भारतात झालेल्या या स्पर्धेत भारताने सेमीफायनलमध्ये बलाढ्य ऑस्ट्रेलियाला आणि त्यानंतर फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेला पराभूत करून पहिल्यांदाच वर्ल्डकप जिंकण्याचा मान पटकावला. आता भारतीय संघाकडे पुन्हा एकदा वर्ल्डकप जिंकण्याची संधी आहे.



स्पर्धेपूर्वी यजमान इंग्लंडविरुद्धच्या सराव सामन्यात भारताला पराभवाचा सामना करावा लागला तसेच विश्वचषकापूर्वी इंग्लंडविरुद्धची टी २० मालिकाही संघाने १-२ अशा फरकाने गमावली होती. संघासमोर काही आव्हाने आणि काही जमेच्या बाजू आहेत.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात आतापर्यंत टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण १६ सामने खेळले गेले आहेत. यापैकी भारताने १३ सामने जिंकले आहेत, तर पाकिस्तानला केवळ २ विजय मिळाले आहेत. विशेष म्हणजे पाकिस्तानचे हे दोन्ही विजय टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत आले आहेत. इतिहासाला मागे टाकून टीम इंडिया छोट्या फॉरमॅटमध्ये मोठा धमाका करून पहिले विजेतेपद उंचावण्यासाठी मैदानात उतरेल.

























सातारा : रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, थोर दानशूर व्यक्तिमत्त्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सवी भव्य सत्कार सोहळा संस्थेच्या वतीने शनिवारी आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांचा मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ, श्रीफळ देऊन हजारोंच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com